दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–११९ | रविवार, दि.२४ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### उपद्रवमूल्याला सरकारी ब्रेक हवाच होता

पैशाच्या थेट देवाणघेवाणीमुळे तक्रारीच्या केंद्रस्थानी आलेल्या ऑनलाइन गेमिंग अॅपवर बंदी आणणाऱ्या विधेयकास राज्यसभेत अखेर मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर राष्ट्रपतींनीही स्वाक्षरी केली असून आता त्याचे कायद्यात रुपांतर झाले आहे. मागच्या काही दिवसांत ऑनलाइन गेमचे पीक सर्वत्र फोफावलेले पहायला मिळाले. झटपट पैसे कमवण्याचे माध्यम म्हणून अल्पावधीत पॉप्युलर ठरलेल्या या गेमिंगने थोरामोठ्यांपासून अनेकांना भुरळ घातली आहे. तथापि, आर्थिक ऑनलाइन गेमचा मुख्य ग्राहक कुणी असेल, तर तो म्हणजे मध्यमवर्गीय तरूण.

### कर्नाटक काँग्रेस आमदार केसी वीरेंद्र यांना ईडीकडून अटक

नवी दिल्लीः कर्नाटक काँग्रेसचे आमदार केसी वीरेंद्र यांना सक्तवसुली संचालनालयाने शनिवारी गंगटोकमध्ये अटक केली. त्यांच्यावर बेकायदेशीर ऑनलाइन आणि ऑफलाइन बेटिंगमध्ये सहभाग असल्याच्या आरोप आहे. केसी वीरेंद्र त्यांच्या सहकाऱ्यांसह सिक्कीममधील गंगटोकला गेले होते. तिथे त्यांनी कथितरित्या एका कॅसिनोसाठी जमीन भाड्याने घेतली होती. ईडीने त्यांच्याशी संबंधित ३० ठिकाणांवर छापा टाकले होते. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी त्यांना अटक केली. या कारवाईत १२ कोटी रुपये रोख रकमेसह सुमारे १ कोटी परकीय चलन, सुमारे ६ कोटी रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि सुमारे १० किलो चांदीच्या वस्तू आणि ४ वाहने जप्त केली होती. ईडीने त्यांची १७ बँक खाती आणि दोन बँक लॉकर गोठवले आहेत.

# खत टंचाईने शेतकरी हैराण !

## केंद्र सरकारचा मात्र पुरेसा साठा असल्याचा दावा

पुणे । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांना चालू खरीप हंगामात खताच्या टंचाई जेरीस आणले आहे. त्यातच खताचा काळाबाजार मोठ्या प्रमाणात सुरु आहे. यावरून देशात राजकारण तापलेले असताना आणि शेतकरी हैराण असतानाच केंद्र सरकार मात्र खतांची उपलब्धता पुरेशी असून, शेतकऱ्यांना वेळेवर आणि योग्य दरात खत उपलब्ध करून देण्यासाठी वचनबद्ध असल्याचे सांगत आहे. परंतु विविध राज्यांमध्ये खत टंचाई आणि खतांचा काळाबाजार शेतकऱ्यांची डोकेदुखी ठरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**



### शेतकरी चिंतेत असताना सरकारचा वेगळाच दावा

केंद्र सरकारच्या माहितीनुसार देशात युरियाची एकूण उपलब्धता १८३ लाख टन आहे. तर गरज १४३ लाख टन आहे. युरियाची विक्री १५५ लाख टन झाली असून गेल्या वर्षीच्या तुलनेत ती १३ लाख टनांनी अधिक आहे. डीएपीची उपलब्धता ४९ लाख टन असून गरज ४५ लाख टन आहे, तर विक्री ३३ लाख टन झाली आहे. एनपीकेएससारख्या मिश्र खतांची उपलब्धता ९७ लाख टन असून गरज ५८ लाख टन आणि विक्री ६४.५ लाख टन इतकी आहे. एकिकडे असा साठा असल्याचे सरकार सांगत आहे तर दुसरीकडे शेतकरी खत मिळत नसल्याने चिंतेत असल्याचे दिसत आहे.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान महाराष्ट्रातील काँग्रेसच्या खासदारांनी खत टंचाईवरून केंद्रीय खत मंत्री जे.पी. नड्डा यांच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन केले. तसेच खताचा कोटा पूर्ण करण्याची मागणी केली. त्यावर तातडीने कार्यवाही ▶▶ पान २ वर

# बोगस कुणबी प्रमाणपत्रामुळे ओबीसींचे आरक्षण संपुष्टात

## बीडच्या बैठकीत लक्ष्मण हाकेकडून सरकारवर हल्लाबोल

बीड । प्रतिनिधी

**शासनाकडून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देतांना झुंडशाहीला बळी पडत कागदपत्रांची शहानिशा न करता अनेकांना बोगस प्रमाणपत्र देण्याचे काम केल्याने राज्यातील ओबीसी समाजाचे आरक्षण संपुष्टात आले असल्याचे ओबीसी समाज आरक्षण बाजाव निघणाऱ्या संघर्ष यात्रेच्या नियोजनासाठी बोलवण्यात आलेल्या बैठकित लक्ष्मण हाके यांच्याकडून सरकारवर आरोप करण्यात आला. यावेळी बैठकीला लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.**



ओबीसी आरक्षण बचाव निघणाऱ्या संघर्ष यात्रेच्या पूर्व नियोजनासाठी बीड शहरातील स्वराज लॉन्स येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. ▶▶ पान २ वर

# सरकारची उपसमिती म्हणजे पोळ्याच्या दिवशी केलेला खांदे बदल–मनोज जरांगे

वडीगोद्री । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणासंदर्भात सरकारने नेमलेल्या उपसमितीवरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारने मराठा समाजाला 'येड्यात काढू नये', असे सुनावत, ही समिती म्हणजे 'जुनेच खूळ' असून 'फक्त खांदे बदलले पोळ्याच्या दिवशी', असा टोला त्यांनी लगावला आहे.**



अंतरवाली सराटी येथे माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील यांनी सरकारवर सडकून टीका केली. 'आमचं म्हणणं सरकारच्या डोक्यात येत नाही, सरकार किडे पडल्यासारखं वागायला लागलं आहे,' असा संताप त्यांनी व्यक्त केला.यावेळी जरांगे यांनी मराठा–कुणबी एक आहेत, असा जीआर काढावा. यासाठी तातडीने कॅबिनेट बैठका घ्या. केसेस मागे घ्या आणि शहीद झालेल्या कुटुंबांना मदत द्या. हैदराबाद व सातारा संस्थानांच्या गॅझेटसाठी मंत्रिमंडळाची बैठक बोलवा. संज्ञा सोयऱ्यांचा जीआर काढावा आदी मागण्या केल्या सरकारने जर आमच्या मागण्यांची अंमलबजावणी केली नाही, तर आम्ही मुंबईला येऊ, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले की, उपसमिती स्थापन करणे आणि त्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. 'उपसमिती तर पूर्वीच होती, फक्त आता दुसरे कोणीतरी अध्यक्ष झाले आहे, याला आमच्याकडे खांदे बदल म्हणतात' असे म्हणत त्यांनी सरकारची कृती निव्वळ पोकळ असल्याचे सांगितले.

## थोडक्यात...

### मतदारयाद्यांमध्ये मोठा घोळ,बारीक लक्ष द्या–ठाकरे

पुणे : एकीकडे राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मतचोरीचा आरोप केल्यानंतर त्याच मुद्द्यावरून आता मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसत आहे. मतदारयाद्यांमध्ये मोठा घोळ झाला आहे, त्याकडे सर्वांनी लक्ष द्या असा कानमंत्र राज ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पुण्यामध्ये मनसेच्या पदाधिकाऱ्यांची त्यांनी बैठक घेतली. यावेळी त्यांनी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. सर्वांनी आपल्या प्रभागांमध्ये जाऊन मतदारयांद्याबाबत जनजागृती करा, अशा सूचना त्यांनी दिल्या. दरम्यान मतचोरीच्या आरोपांची चौकशी झाली पाहिजे, चौकशी झाली तर १०–१२ वर्षांचा खेळ उघडा पडेल, असे वक्तव्यही राज ठाकरेंनी बैठकीत केले आहे.

### अनिल अंबानी यांच्याविरुद्ध एफआयआर

मुंबईः उद्योगपती अनिल अंबानी यांच्या अडचणी काही कमी होताना दिसत नाहीत. केंद्रीय अन्वेषण विभागाने शनिवारी एका मोठ्या बँक फसवणुकीच्या आरोपाखाली एफआयआर नोंदवला. तसेच रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि त्यांचे प्रमोटर डायरेक्टर अनिल अंबानी यांच्याशी संबंधित मुंबईतील ठिकाणांवर छापेमारी केली, असे वृत्त पीटीआयने अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिले आहे. या प्रकरणात एका कथित फसवणुकीचा समावेश असून ज्यामुळे स्टेट बँकेला ऑफ इंडियाला २ हजार कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागले. १७ हजार कोटींपेक्षा अधिक रकमेच्या अनेक बँक कर्ज घोटाळ्यांशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणी ५ ऑगस्ट रोजी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अनिल अंबानी यांची सुमारे १० तास चौकशी केली होती. त्यानंतर आता त्यांच्याशी संबंधित ठिकाणांवर आता छापे टाकण्यात आले आहेत.

### शेतकऱ्यांनी नुकसानीची सवय लावून घ्यावी–पटेल

धाराशिवः राज्यामध्ये मागील चार महिन्यांत ७४० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. राज्यामध्ये जोरदार पावसामुळे लाखो एकरवरील शेतपीकांचे नुकसान झाले आहे. दुसरीकडे भाजप नेते आणि केंद्रीय कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटले यांनी शेतकऱ्यांना एक अजब सल्ला दिला. शेतकऱ्यांनी आता नुकसानीची सवय लावून घ्यावी, असे त्यांनी म्हटले आहे. सरकार नुकसान भरपाई देऊ शकत नाही, असे म्हणत त्यांनी हात झटकले आहेत. या विधानामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.

### तुळजापूर–नळदुर्ग रोडवर एसटी बसला आग

धाराशिवः जिल्ह्यातील तुळजापूर–नळदुर्ग रोडवर शनिवारी (२३ ऑगस्ट) दुपारी एक खळबळजनक घटना घडली. तुळजापूरहून नलेगावकडे जाणाऱ्या एका धावत्या एसटी बसने अचानक पेट घेतला. मात्र, बसचालकाने प्रसंगावधान राखून तात्काळ बस थांबवली आणि सर्व ४० प्रवाशांना सुखरूप बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला. दुपारच्या सुमारास ही एसटी बस नळदुर्गच्या दिशेने जात असताना अचानक ती आगीच्या ज्वाळांनी वेढली गेली. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली असावी. आगीचा भडका इतका वेगाने पसरला की, काही क्षणांतच संपूर्ण बसने पेट घेतला. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये प्रचंड घबराट पसरली. परंतु, चालक आणि वाहकाने तत्परता दाखवत सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढले. यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, पण काही मिनिटांतच बस पूर्णपणे जळून खाक झाली.

### पाकिस्तान जिंदाबाद म्हणणे देशद्रोह नाही; हायकोर्टाचा मोठा निर्णय

शिमला । वृतसस्था

सोशल मीडियावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो पाकिस्तान जिंदाबाद असे कॅप्शन देऊन शेअर केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या पाओंटा साहिब येथील फेरीवाला सुलेमान याला हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. केवळ पाकिस्तान जिंदाबाद असे शब्द उच्चारणे किंवा लिहिणे हा देशद्रोहाचा गुन्हा ठरत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. न्यायमूर्ती राकेश कैंथला यांनी हा निकाल दिला. आरोपीच्या कृत्यामुळे भारत सरकारविरोधात द्वेष, असंतोष किंवा फुटीरतावादी प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळाल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. ''केवळ पाकिस्तान जिंदाबाद या शब्दांमुळे देशद्रोहाचा गुन्हा सिद्ध होत नाही, कारण त्यातून सशस्त्र ▶▶ पान २ वर

# राज्यात एक कोटी लखपती दीदी करणार–देवेंद्र फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील महिलांना सक्षम करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध असून येत्या काळात एक कोटी बहिणींना लखपती दीदी बनविल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महिलांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. विरोधक कितीही टीका करोत, पण महिलांसाठी सुरु केलेली कोणतीही योजना पुढील पाच वर्षे बंद होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.**



भारतीय जनता पार्टीच्या 'माझा भाऊ देवाभाऊ' अभियानांतर्गत राज्यभरातील महिलांनी पाठविलेल्या हजारो राख्यांचा सोहळा शनिवारी पार पडला. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी बहिणींनी दिलेल्या प्रेमाचा स्वीकार करून त्यांना आभार मानले. या कार्यक्रमात भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार, आमदार चित्रा वाघ, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार विद्या ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, ''बहिणींच्या ▶▶ पान २ वर

# माझ्या पांडुरंगाला मी मटण खाल्लेलं चलतं–खा.सुप्रिया सुळे

पुणे । प्रतिनिधी

**माझ्या पांडुरंगाला मी मटण खाल्लेलं चलतं, तर तुम्हाला काय प्रॉब्लेम? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. आम्ही आमच्या पैशाने मटण खातो, आम्ही कुणाचे मिंधे नाही असेही त्या म्हणाल्या. यावेळी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर देखील सुप्रिया सुळे यांनी टीका केली. पत्ते तुम्ही खेळायचे आणि कोर्टात चकरा आम्ही मारायच्या का? असा सवाल सुळेंनी केला.**



मुख्यमंत्री वेळ देत नाहीत, म्हणून आम्ही थेट दिल्लीत जाऊन अमित शाह यांची भेट घेतो दिंडोरीच्या खेडगावमध्ये महात्मा फुलेंच्या पुतळ्याचे अनावरण झाले. या कार्यक्रमात सुप्रिया सुळे बोलत होत्या. कार्यक्रमात भाषण दरम्यान मंत्री नरहरी झिरवळ ▶▶ पान २ वर

# वैद्यकीय मदत समन्वयकावर हल्ला प्रकरणी सहाजणावर गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

**घरामध्ये घुसून एका तरूणास घातक शस्त्राने मारहाण करून गंभीररित्या जखमी केल्याची घटना बीड शहराजवळ असलेल्या पालवण येथे घडली. या प्रकरणी सहा जणांविरोधात बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

यातील मुख्य आरोपी पोलिसांना अटक केले असून इतर आरोपी फरार झाले आहेत. विलास भारत मस्के (वय ३२ रा.पालवण) या तरूणाला घराच्या बाहेर बोलवून निखिल मस्के सह, इतरांनी घातक शस्त्राने मारहाण केली. या मारहाणीत सदरील तरूण गंभीर रित्या जखमी झाला. त्याच्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी विलास मस्के याच्या फिर्यादीवरून ▶▶ पान २ वर

# पत्नीची खून करून पतीची आत्महत्या

जालना । प्रतिनिधी

**भोकरदन तालुक्यातील पारद येथे कौटुंबिक वादातून पत्नीचा खून करून पतीने गळफास घेऊन जीवन यात्रा संपली अशी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पारध येथे शनिवार, २३ ऑगस्ट रोजी घडली.**

भोकरदन तालुक्यातील पारध बुद्रुक येथे शनिवारी पहाटे ही घटना घडली. समाधान अल्हाट यांनी पत्नी कीर्ती हिच्या डोक्यात धारदार पहार घालून हत्या केली व त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. समाधान व कीर्ती यांच्या विवाहास पाच वर्षे झाली होती. दाम्पत्याला दोन वर्षांची स्वामीनी व पाच वर्षांचा रुद्र अशी दोन लहान अपत्ये आहेत. काही दिवसांपासून दाम्पत्यामध्ये वाद सुरू होते. कीर्ती काही दिवसांपूर्वी माहेरी वसई, ( ता.सिल्लोड ) येथे गेली होती. समाधान अल्हाट याने तिला पाचसहा दिवसांपूर्वी जबरदस्तीने पारध येथे ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.५० क्विंटल | २,५६१ | २,७१६ | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड :६२.०० क्विंटल | २,१५० | २,६४५ | २,४३१ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | १,८०० | २,८५२ | २,५११ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,१९१ | ८,१९१ | ८,१९१ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०१ | ५,८०० |

# गरम सिंदूरचं आता काय कोल्ड्रिक्सं झालं काय?



## भारत–पाक क्रिकेट सामन्यावरून उद्धव ठाकरे यांची टीका

मुंबई । प्रतिनिधी

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानस्थित दहशतवादी तळावर हल्ले करून उद्धवस्त केले. तत्पूर्वी बिहारमध्ये निवडणूक रॅलीला संबोधित करण्यासाठी गेलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मेरे शरीर मे खून नही तो गरम सिंदूर बह रहा है, असे वक्तव्य करत उपस्थित समुदायाला भावविवश केले. त्यास तीन चार महिनेच उलटून जात नाहीत तोवर भारत पाकिस्तानमधील क्रिकेट सामन्याला केंद्र सरकारने परवानगी दिली. त्यावरून शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपावर हल्लाबोल करत सडकून टीका करत गरम सिंदूरचं आता काय कोल्ड्रिंक्स झाल काय ? असा सवाल पंतप्रधान मोदी यांना केला.

यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, कबुतरं, कुत्रे आणि हत्तीणीसाठी लोक रस्त्यावर उतरतात, मात्र हिच माणूसकी जेव्हा पहलगाममध्ये लोक मारले गेले तेव्हा कुठे गेली होती. आता पाकिस्तानबरोबर भारताची टीम क्रिकेट खेळणार आहे. मग कुठे गेला सिंदूर? असा खोचक सवाल ठाकरे यांनी यावेळी केला. उद्धव ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# उपद्रवमूल्याला सरकारी ब्रेक हवाच होता

पैशाच्या थेट देवाणघेवाणीमुळे तक्रारीच्या केंद्रस्थानी आलेल्या ऑनलाइन गेमिंग ॲपवर बंदी आणणाऱ्या विधेयकास राज्यसभेत अखेर मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर राष्ट्रपतींनीही स्वाक्षरी केली असून आता त्याचे कायद्यात रूपांतर झाले आहे. मागच्या काही दिवसांत ऑनलाइन गेमचे पीक सर्वत्र फोफावलेले पहायला मिळाले. झटपट पैसे कमवण्याचे माध्यम म्हणून अल्पावधीत पॉप्युलर ठरलेल्या या गेमिंगने थोरामोठ्यांपासून अनेकांना भुरळ घातली आहे. तथापि, आर्थिक ऑनलाइन गेमचा मुख्य ग्राहक कुणी असेल, तर तो म्हणजे मध्यमवर्गीय तरूण. अनेक चांगल्या घरातील मुलांना या ऑनलाइनच्या व्यसनाने अक्षरश: विळखा घातला आहे. एकेकाळी मद्यपान आणि जुगाराचे व्यसन जडले, की पोरगे वाया गेले, असे म्हटले जाई. ऑनलाइन गेमिंगचे व्यसनही याच पठडीतले.

या व्यसनापायी असंख्य कुटुंबांची आयुष्यभराची कमाई लुटली गेल्याचे सांगितले जाते. आजमितीला जवळपास ४५ कोटी लोक या गेमिंगच्या सापळ्यात अडकले आहेत. त्यामध्ये २० हजार कोटीहून अधिक रूपयांचा चुराडा झाला आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्यसभेत ऑनलाइन गेमिंगचे नियमन आणि प्रसार यासंदर्भातील विधेयक मांडताना दिली. ती गंभीरच म्हणायला हवी. यातून उच्चभ्रू तसेच मध्यमवर्गीय समाजासाठी ऑनलाईन गेमिंग ही किती मोठी समस्या बनली आहे, हेच अधोरेखित होते. पैसा हे साधन आहे. ते साध्य नव्हे, हे आपल्या पूर्वसुरींनी आपल्याला घसा फोडून सांगितले. अनेक संत, महंत, विचारवंत, बुद्धिवंत, तत्त्वज्ञ हेच सांगत आलेत. जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, असा संदेश संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून देतात. परंतु, पैसा हेच साध्य असल्याची वृत्ती दिवसेंदिवस बळावत आहे. त्यापायीच कुठल्याही मार्गाने कसा आणि किती पैसा कमवता येईल, यावर फोकस ठेवला जातो. मेहनतीने, कष्टाने तसेच प्रामाणिकपणे योग्य मार्गाने पैसा कमवण्यात काहीही गैर नाही. परंतु, त्याऐवजी शॉर्टकटने झटपट पैसा कमवण्याकडे अनेकांचा कल असतो. त्याकरिता मग वेगवेगळे फंडे वापरले जातात. मटका, जुगार, लॉटरी किंवा आर्थिक गंडे घालणे, हे यातील पूर्वापार प्रकार. आता त्यात ऑनलाइन गेमिंग नावाचे दुकानही जोडले गेले आहे. यात पैसे भरणे, पैसे जिंकणे किंवा बोली लावणे, यासारखे प्रकार सर्रास पहायला मिळतात. मात्र, आता या साऱ्याला पायबंद बसू शकेल. भारतासारख्या देशात क्रिकेट हा खेळ प्रचंड लोकप्रिय आहे. क्रिकेटचे स्थान येथे जणू धर्मासारखे. या क्रिकेटच्या सामन्यातील खेळाडूंचे संघ तयार करायचे, कोट्यावधींची बक्षिसे जिंकून देणाऱ्या स्पर्धा चालवायच्या, हे काम हे ॲप करतात. त्यांना मिळणारा प्रतिसाद कल्पनेपलीकडचा. या स्पर्धांमध्ये किती पैसे गुंतवले जातात, यालाही काही गणती नाही. त्यामुळे अल्पावधीतच ड्रीम इलेव्हनची आर्थिक उलाढाल आठ अब्ज डॉलरवर जाते. तर एमपीएलची उलाढाल २.३ अब्ज डॉलरवर पोहोचते. परंतु, नव्या कायद्यामुळे यावर निर्बंध येऊ शकतील. स्वाभाविकच या कंपन्यांच्या उत्पन्नावरही त्यातून गंडांतर येईल, हे वेगळे सांगायला नको. आर्थिक आमिष दाखवून फसवणूक, अशा बातम्या आपण सर्रास वाचत असतो. गेमिंग ॲप म्हणजे तर मधाचे रसरशीत पोळेच. कोट्यावधी ऊपये जिंकण्याचे चाटण त्यातून दिले जाते. त्यामुळे त्याच्याकडे आपोआप लोक आकर्षित होतात. कधी कुणाला फायदा वा कुणाला नुकसान होते. पण, एकदा का याची चटक लागली, की माणसाचे मन, मेंदू पूर्णपणे या गेमच्याच जाळ्यात गुरफटून जातो. मग ती व्यक्ती कुणाचेही काही ऐकण्याच्या व समजून घेण्याच्या मन:स्थितीत नसते. अनेकदा वापरकर्ते गुंतवलेले पैसे वारंवार गमावून बसतात. शेवटी त्यांच्या पदरी नैराश्य येते. मग त्याला जोडून मद्यपान व तत्सम अन्य व्यसनेही जडतात आणि अंतिमत: संबंधित व्यक्तीकडून टोकाचे पाऊल उचलले जाण्याचा धोकाही निर्माण होतो. अलीकडच्या काळात ड्रीम इलेव्हनसह मोबाइल प्रीमिअर लीग, गेम्स २४ बाय ७, पोकर, झुपी, विन्झो अशा ॲपनी भारतीय गेमिंगच्या विश्वात दबदबा निर्माण केला आहे. या कंपन्या अब्जावधी डॉलरच्या मालक बनल्या आहेत. अनेक स्पर्धांसाठी या कंपन्या प्रायोजकत्वही बहाल करतात. किंबहुना, असे गेमिंग ॲप चालवणे, त्याची जाहिरात करणे किंवा त्यासाठीच्या आर्थिक व्यवहारांची सुविधा पुरवणे, यावरही या विधेयकामुळे बंदी असेल. खेळाडू वा सेलिब्रिटी अशा ॲपची जाहिरात करत असतात. पण, यापुढे त्यांना अशा जाहिराती करता येणार नाहीत. आता काही कंपन्यांनी याबाबत न्यायालयात जाण्याचीही भूमिका घेतली आहे. मात्र, सर्वनाशाला कारणीभूत ठरलेल्या या कंपन्यांचे उपद्रवमूल्य बघता त्यांच्यावरील निर्बंध आवश्यकच ठरतात.

## मराठा समाजाच्या मुंबई मोर्चात सहभागी व्हावे-सुनील नाथ



**कडा । प्रतिनिधी**

**मराठा आंदोलन मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार दि. २९ ऑगस्ट रोजी मराठा समाज मुंबईच्या दिशेने निघणार असून, या आरक्षण मोर्चात मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सुनील नाथ यांनी केले.**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगेंनी पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेत मैदानात उतरून चलो मुंबईची हाक दिली. त्यांच्या या हाकेला प्रतिसाद देण्यासाठी मराठा बांधवांनी मुंबई मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन तालुकाध्यक्ष नाथ यांनी केले आहे.

## शेतवस्तीवर चोरट्यांचा धुमाकूळ

**कडा । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील निमगावचोभा परिसरातील गिऱ्हे वस्तीवर अज्ञात चार चोरट्यांनी घरातील व्यक्तींना मारहाण करून सोन्या- चांदीच्या दागिन्यांसह साठ हजाराचा ऐवज लुटून चोरट्यांनी पलायन केल्याची घटना शुक्रवार दि. २२ रोजी पहाटेच्या सुमारास घडली.**



पोलीस सूत्रांकडून देण्यात आलेली अधिक माहिती अशी की, आष्टी तालुक्यातील निमगावचोभा येथे गिऱ्हे वस्तीवर शुक्रवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास सतीश नवनाथ गिऱ्हे यांच्या घराचा कडीकोंडा उघडून अज्ञात चार चोरट्यांनी घरातील व्यक्तींना मारहाण करीत चार ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, साडेतीन ग्रॅमचे डोरले व चांदीचे पैंजण असा एकूण पन्नास ते साठ हजाराचा ऐवज लुटून चोरट्यांनी पलायन केल्याची घटना घडली. घरफोडी झाल्याची माहिती मिळताच सपोनि विजय नरवडे, पोकॉ भाऊसाहेब आहेर, नंदकिशोर सवाशे, अमोल नवले, सरकारी वाहनचालक प्रताप घोडके यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत चोरट्यांनी पलायन केले होते. याबाबत अज्ञात चोरट्याविरुद्ध आष्टी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि नरवडे करीत आहेत. घटनास्थळी बीडच्या श्वान व अंगुली निर्देश पथकाला पाचारण करण्यात आले होते.

## फोटोग्राफर असोसिएशन अध्यक्ष सचिन रानडे, उपाध्यक्ष सागर ढोले

**आष्टी । प्रतिनिधी**

**जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त तालुक्यातील फोटोग्राफर असोसिएशन पदाधिकारी निवडीची वार्षिक बैठक संपन्न झाली. या बैठकीत अध्यक्ष म्हणून सचिन रानडे तर उपाध्यक्षपदी सागर ढोले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.**





आष्टी येथील फोटोग्राफर सचिन रानडे यांची अध्यक्षपदी फेरनिवड झाली. कड्यातील सागर ढोले यांची उपाध्यक्ष, अशोक राऊत यांची सचिव, संतोष सायकड यांची कोषाध्यक्ष तर राजू करांडे यांची खजिनदार म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त निवड प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. याप्रसंगी नूतन पदाधिकाऱ्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

## घनसावंगी तालुका खरेदी विक्री संघ राष्ट्रवादीच्या ताब्यात



**जालना । प्रतिनिधी**

**घनसावंगी तालुका खरेदी विक्री संघाच्या सभापतीपदी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे दत्तात्रय दशरथराव तौर यांची सभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली. घनसावंगी तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये १७ पैकी १७ सदस्य माजीमंत्री राजेश टोपे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बिनविरोध निवडूण आल्यानंतर सभापतीपदाच्या निवडीची औपचारिकता संपन्न झाली.**

निवडणुक निर्णय आधिकारी म्हणून सहायक निबंधक आधिकारी सातपुते यांनी काम पाहिले. संचालक मंडळामध्ये दिपक मरकड, रामभाऊ बोबडे, गुलाबराव चव्हाण, सुशील तौर, युवराज आर्दड, सौ.शारदा ज्ञानोबा साबळे, सौ.सरोज सुशील तांगडे, दत्तात्रय आर्दड, सिध्देश्वर शिंदे, हनुमंत मोरे, संतोष मुळे, सौ.अनुराधा राजेंद्र कोल्हे, सौ.पद्माबाई नेताजी देशमुख, सुभाषराव वाव्हळे, भगवानराव गायकवाड, सौ.संजीवनी भास्कर गाढवे यांनी मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग घेतला. नवनिर्वाचित सभापती व संचालक मंडळांच्या बिनविरोध निवडीचे कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंद साजरा केला.

## बीड येथे ४४ व्या राज्यस्तरीय योग स्पर्धेचे उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

**बीड येथील माँ वैष्णो पॅलेस मध्ये आज दिनांक २३ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या ४४ व्या महाराष्ट्र योगा स्पोर्ट्स चॅम्पियनशीप बीड २०२५ या स्पर्धेचे भव्य उद्घाटन आज दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाले.**





योगा फेडरेशन ऑफ इंडिया यांना संलग्न असलेल्या महाराष्ट्र योग असोसिएशन यांच्या वतीने बीड येथे ४४ व्या राज्यस्तरीय योगा स्पोर्ट्स चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे . बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशन व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीड यांना या स्पर्धेचे यजमानपद दिलेले आहे .आज दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी माँ वैष्णो पॅलेस एमआयडीसी पेठ बीड या ठिकाणी या स्पर्धेचे भव्य उद्घाटन संपन्न झाले .या उद्घाटन सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून दैनिक पार्श्वभूमी चे संपादक माननीय गंमत भाऊ भंडारी यांची उपस्थिती लाभली . कार्यक्रमासाठी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महामंत्री, या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष संतोष सोहनी हे व्यासपीठावर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्यासाठी फर्टीलायझर्स असोसिएशन बीड चे अध्यक्ष मा.अंगदजी नवले, व्यापारी महासंघाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष विनोद पिंगळे, राजस्थानी सेवा समाज संस्थेचे अध्यक्ष विष्णूदास तापडिया, राजस्थानी सेवा समाज संस्थेचे सचिव मा. रामेश्वर कासट उपस्थित होते . तसेच महाराष्ट्र योग असोसिएशन चे चेअरमन तथा भारतीय योग संघाचे प्रशिक्षक व कर्णधार माननीय श्री चंद्रकांत पांगारे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी महाराष्ट्र योग असोसिएशन च्या अध्यक्ष डॉ. अनिता पाटील, सेक्रेटरी श्री जतीन सोळंके, कोषाध्यक्ष श्रीमती अनिता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमासाठी शिक्षण विस्तार अधिकारी श्री तुकाराम जाधव, आयोजन समितीचे कार्याध्यक्ष श्री सचिन ढेपे कार्याध्यक्ष श्री प्रदीप दादा क्षीरसागर, नगरसेवक ,श्री सतीश आप्पा पवार ,रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाउन चे अध्यक्ष आदरणीय राहुलजी बोरा ,बीड जिल्हा पतंजली योग समितीचे अध्यक्ष नितीनजी गोपन, दैनिक समर्थ राजयोग चे संपादक वैभव स्वामी , मा.नगरसेवक किशोरजी काळे, बीड शहरातील मोजकर ग्रुपचे संस्थापक, प्रसिद्ध उद्योगपती श्री प्रवीण मौजकर, बीड जिल्हा मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस श्री रामचंद्र ठोसर, पतंजली योग समितीचे बीड तालुका प्रभारी विलास घोडके ,राजस्थानी सेवा समाज संस्थेचे संचालक श्री अशोक मंत्री, छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक शिवनाथ म्हेत्रे , प्रसिद्ध व्यापारी रामप्रसादजी बियाणी व्यासपीठावर उपस्थित होते .बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशनचे अध्यक्ष श्री विनायकराव वझे ,महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीड चे अध्यक्ष श्री विकास गवते व्यासपीठावर उपस्थित होते. या उद्घाटन पर सोहळ्यामध्ये सर्वप्रथम दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली .त्यानंतर राज्यस्तरीय योगा स्पोर्ट चंपियनशिप बीड २०२५ च्या आयोजन समितीच्या वतीने सर्व पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार कार्यक्रम नंतर पुणे येथील नारायणी योगा अँड फिटनेस गुरुकुल चे योग खेळाडू व पुणे डिस्ट्रिक्ट योग असोसिएशनचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू यांनी देशभक्तीपर गीता वर सुंदर असा कलात्मक योग डेमो डान्स या कार्यक्रम प्रसंगी पाहुण्यासमोर सादर केला आणि पाहुण्यांची मन जिंकली सर्व उपस्थित पाहुण्यानी या खेळाडूंचे कौतुक केले.आज सकाळी नऊ वाजल्यापासून बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस या कार्यालयामध्ये ही स्पर्धा सुरू आहे. आज सायंकाळी ९ वाजेपर्यंत ही स्पर्धा सुरू असून महाराष्ट्र राज्यातील जवळपास २१ जिल्ह्यातील खेळाडू या स्पर्धेसाठी बीड शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. ३०० योग खेळाडू वेगवेगळी स्पर्धात्मक आसने या ठिकाणी सादर करणार असून आलेल्या खेळाडू मधून मैसूर येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगा कॉम्पिटिशन साठी महाराष्ट्र राज्याच्या संघाची निवड केली जाणार आहे. उद्या सकाळी २५ ऑगस्ट २०२५ रोजी नऊ ते एक वेळेमध्ये राहिलेली उर्वरित स्पर्धा संपन्न होईल. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत दुपारी तीन ते पाच या वेळेत या स्पर्धेचे बक्षीस वितरण होणार आहे . बक्षीस वितरण कार्यक्रमांमध्ये सुंदर अशा योगा डेमोचे सादरीकरण केले जाणार आहे. तसेच मैसूर येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगा कॉम्पिटिशन साठी महाराष्ट्र राज्याची निवड घोषित केली जाणार आहे. तरी सर्व बीड वासीयांनी उद्या रविवारी सकाळी नऊ ते पाच या वेळेमध्ये माँ वैष्णो पॅलेस कार्यालयामध्ये सुरू असलेल्या स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन स्पर्धेचे स्वागताध्यक्ष श्री संतोष सोहनी यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### खत टंचाईने

करण्याचे आश्वासन खत मंत्र्यांनी दिले. परंतु अद्यापही राज्यातील शेतकऱ्यांना खत टंचाईचा सामना करावा लागत आहे. राजस्थानमध्ये काही भागांत खत खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे समोर येत आहे. तर तेलंगणामध्ये युरियाच्या काळाबाजाराने जोर धरला आहे. युरियाच्या २६६ रुपयांच्या एका पोत्यासाठी ४०० रुपये शेतकऱ्यांना मोजावे लागत आहेत, असा आरोप केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांनी केला आहे. तर मागील महिन्यात एका विक्रेत्याला जास्त दराने युरिया विकताना उत्तर प्रदेशचे कृषिमंत्री सुर्य प्रताप साहिं यांनी पकडले होते. तसेच त्याचा परवाना निलंबित करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे विविध राज्यांमध्ये खत टंचाईवरून गोंधळ उडालेला आहे. मात्र जागतिक संघर्षांमुळे खतांच्या आंतरराष्ट्रीय उपलब्धतेवर व किमतींवर परिणाम झाला असला, तरीही धोरणात्मक निर्णय व दीर्घकालीन करारांमुळे देशातील शेतकऱ्यांना कोणतीही अडचण होऊ दिली नाही, असा केंद्र सरकारचा दावा आहे.

-----------

### बोगस कुणबी प्रमाणपत्रामुळ

या बैठकीत लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांच्यातील मागील चार दिवसात झालेल्या आरोप प्रत्यारोपाचे तील मतभेद दूर करण्यासाठी तसेच पुढील काळात काढण्यात येणाऱ्या ओबीसी आरक्षण बाजाव संघर्ष यात्रेच्या नियोजनासाठी बोलवण्यात आली होती. यावेळी बोलतांना हाके म्हटले की, राज्य सरकारने ओबीसी बांधवांची फसवणूक करत अनेक मराठा समाजातील नागरिकांना बोगस कुणबी प्रमाणपत्र देण्याचे काम केले आहे. त्याच बरोबर या सरकारला झुंडशाहीची भाषा कळत असल्याने राज्यातील सर्व घटकातील ओबीसी बांधव एकत्र येत पुढील काही काळातच ओबीसी बचाव आरक्षण संघर्ष यात्रा काढण्यात येणार आहे. त्याचबरोबर बीड जिल्ह्यातील आणि जालना जिल्ह्यातील काही मराठा आमदारांकडून मनोज जरांगेच्या उद्या निघत असलेल्या मुंबई येथील यात्रेसाठी दहा लाखापेक्षा अधिक पैसे देऊन ओबीसीचा आरक्षण सोपविण्याचा प्लॅन केला जात असल्याचे त्यांनी यावेळी आरोपी केले.

**ओबीसीच्या हक्क लढाईसाठी पूर्वबांधणी सुरू –वाघमारे**

राज्य शासनाला लोकशाहीचा विसर पडल्याने झुंडशाहीच्या आहारी गेलेल्या सरकारचे कानउघाडणी करण्यासाठी तसेच ओबीसीचे आरक्षण बचावासाठी संघर्ष यात्रा काढणार असल्याने बीडमध्ये यासंदर्भात बैठकीत करून पूर्व नियोजन केले जात आहे. ओबीसी बांधवांचे हिरावून घेत असलेले आरक्षण टिकविण्यासाठी संघर्ष यात्रेच्या माध्यमातून सरकारला जागे करण्यासाठी बांधणी करत असल्याचे नवनाथ वाघमारे यांनी म्हटले आहे.

-----------

### राज्यात एक कोटी लखपती

आशीर्वादाने २०२९ मध्येही महाराष्ट्रात आमचेच सरकार सत्तेत येईल. महायुती सरकार महिलांच्या सहकारी संस्थांना हक्काचे स्थान देण्यासाठी कटिबद्ध आहे देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''विरोधक म्हणतात की लाडक्या बहिणींसाठीची योजना बंद होणार. पण मी आश्वासन देतो की, २०२९ पर्यंत लाडक्या बहिणींसाठी असणारी कोणतीही योजना बंद होणार नाही. त्यानंतर आमचे सरकार आले तर या सर्व योजना पुढेही सुरू ठेऊ.असे मुख्यमंत्री म्हणाले.

---------

### पाकिस्तान जिंदाबाद म्हणणे देशद्रोह

बंडखोरी किंवा विध्वंसक व फुटीरतावादी कारवायांना चिथावणी मिळत नाही,'' असे न्यायालयाने म्हटले आहे.

-----------

### वैद्यकीय मदत समनवयकावर हल्ला

आरोपी निखिल मस्के सह इतर पाच जणांविरोधात कलम ३०७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. यातील मुख्य आरोपी निखिल मस्के याला पोलिसांनी अटक केली असून इतर आरोपी मात्र फरार आहेत.

---------------

### गरम सिंदूरचं आता काय कोल्ड्रिक्सं

ठाकरे म्हणाले की, दोन तीन महिनेच झाले, आपले संरक्षण मंत्री म्हणाले होते की, आपले ऑपरेशन सिंदूर थांबलेले नाही तर पंतप्रधान मोदी म्हणाले की, रक्त आणि पाणी एकत्रित वाहणार नाही. आनंदाची गोष्ट आहे. मेरी रगो रगो मे खून नही गर्म सिंदूर बह रहा है मग त्या गरम सिंदूरचं आता कोल्ड्रिक्स झालं का? तुम्ही क्रिकेट खेळायला परवानगी देता? आपल्या देशाची टीम आता पाकिस्तानबरोबर क्रिकेट सामने खेळणार मग कुठे सिंदूर कुठे गेला? तुम्ही घराघरात वाटला ना सिंदूर मग तो सिंदूर कुठे गेला? कशाला भाकडकथा करता? असा खोचक सवालही पंतप्रधान मोदी आणि भाजपाला केला. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, प्रत्येक प्रश्नावेळी डोक्यावर बर्फ आहे, काय करू ? असा सवाल करत तसला थंडपणा आपल्याला परवडणारा नाही. आपण सध्या शिक्षणाचा दर्जा का उंचावत नाहीत. आमचा कोणत्याही भाषेला, हिंदीलाही विरोध नाही. परंतु आमचा सक्तीला विरोध असून सक्ती कशासाठी ? आता माझ्यापेक्षा चांगले हिंदी पंतप्रधान मोदी बोलतात, मग ते कोणत्या शाळेत शिकले ? त्यांनाही पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती होती का ? मग तरीही आश्वासन देण्यापुरतं चांगलं हिंदी येते ना असा उपरोधिक टोलाही यावेळी पंतप्रधान मोदी यांना लगावला. उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, पंतप्रधान मोदी बिहारमध्ये गेले होते. तेव्हा ते म्हणाले की, विरोधक हे घुसखोरांना आणि भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा बचाव करण्यासाठी पुढे आले आहेत. मला त्यांना सांगायचाय की, तुम्ही जेव्हा महाराष्ट्रात येता तेव्हा तुमच्या आजबाजूला जो दंभ मेळा असतो, कुंभमेळा वेगळा आणि दंभ मेळा वेगळा असतो. तुम्ही ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले, ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोपी कोण? आदर्श घोटाळ्याचा आरोप कोणी केला ? त्यानंतर दुसऱ्या दिवशी अशोक चव्हाण लगेच तिकडे गेले, मग तुम्हीच सांगा कोण कोणाचं संरक्षण करते, असे सांगत पंतप्रधान मोदी आणि भाजपाला ठाकरे यांनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. बांग्लादेशी घुसखोरांच्याबाबत भाजपाच्या आरोपाबाबत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, शेख हसीना यांना तुम्ही आश्रय दिला. आम्ही नाही. बांग्लादेशींना तुम्ही विरोध करता आणि बांग्लादेशातून पळून आलेल्या माजी पंतप्रधानांना तुम्ही आश्रय देता ? भ्रष्टाचाऱ्यांना उपमुख्यमंत्री पद आणखी काही पदे देता, खरं तर मला यांची कीव येते. आता आपल्याकडे कबुतरासाठी हजारो लोकं रस्त्यावर उतरतात. कुत्र्यासाठीही हजारो रस्त्यावर उतरतात, चांगली गोष्ट आहे. माणुसकी पाहिजे, मग ही माणुसकी जेव्हा पहलगाममध्ये आपले काही लोक मारले गेले ज्या माता भगिनींचा सिंदूर पुसला गेला, तेव्हा माणुसकी कुठे जाते ? असा सवालही यावेळी केला.

-----------

### माझ्या पांडुरंगाला मी मटण

यांच्यां समोरच सुप्रिया सुळे यांची सरकारवर सडकून टीका केली. ५० वर्षांपूर्वी शरद पवार एका मुलीवर थांबले. स्वतःचं ऑपरेशन केलं, मात्र पत्नीचे नाही, हे खरं पुरोगामित्व असल्याचे सुळे म्हणाल्या. १० वेळेस वेळ मागून देखील मुख्यमंत्री वेळ देत नाहीत. म्हणून आम्ही थेट दिल्लीत जाऊन अमित शाह यांची भेट घेतो असेही सुळे म्हणाल्या. यावेळी सुळे यांनी अमित शाह यांचे जाहीर आभार देखील मानले. जुळवून दोन्ही बाजूने घ्यावं लागत, एका बाजूने नाही असे म्हणत सुळे यांनी मंत्री नरहरी झिरवाळ यांना टोला लगावला.राज्याचे मुख्यमंत्री म्हणाले होते सरसकट कर्जमाफी देतो. ओला दुष्काळ जाहीर करावा म्हणून फक्त राष्ट्रवादी शदर पवार गटाचे खासदार अमित शाह यांच्याकडे गेले होते. ते गृहमंत्री नाही तर सहकार मंत्री आहेत म्हणून असे सुळे म्हणाल्या. अधिकार त्यांना आहे म्हणून गेलो. मुख्यमंत्री तर मला वेळच देत नाही, त्यामुळे मी मागणच बंद केलं आहे. दहा वेळा आपण वेळ मागतो पण वेळ देत नाहीत याचा अर्थ काय, त्यांना वेळ द्यायचा नाही असे सुळे म्हणाल्या. मी ठरवलं आहे, इथे काम करत नाही ना, माझी कामं दिल्लीत होतात असेही त्या म्हणाल्या.

-----------

### पत्नीची खून करून

आणल्याचे समजते. मात्र पत्नीला ठार मारण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेची माहिती मिळताच पारध पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने, व पोलीस पथकता त्काळ घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. भोकरदनचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांनी देखील घटनास्थळी दाखल होऊन पोलिसांना तपासा बाबत सूचना दिल्या. रात्री उशिरा पर्यंत पारध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. २४ ऑगस्ट २०२५



## थोडक्यात...



आष्टी : तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल आमदार सुरेश आण्णा धस यांनी सचिन रानडे यांचा सत्कार करताना समवेत ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सुरेश आण्णा धस यांचे स्वयंसहाय्यक विनोद नाना रोडे दीपक उंबरकर विकास साळवे आदी छाया शरद रेडेकर




पिंपळवंडी:- मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर २९ ऑगस्टला मुंबई येथे आंदोलन करण्यात येणार आहे.पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे बैलपोळ्याला शेतकऱ्यांनी बैलाच्या अंगावर ''चलो मुंबई'',''मनोज जरांगे संघर्ष योद्धा'' असा संदेश लिहून २९ ऑगस्टला मुंबईला जाण्याचे आवाहन केले.

### भावार्थ रामकथेची आज सांगता

**महाप्रसादाच्या पंगतीचा लाभ घ्यावा -सानप**

शिरूर : तालुक्यातील फुलसांगवी येथील श्री संत वामनभाऊ महाराज मंदिरामध्ये श्रावण मासानिमित्त



भावार्थ राम कथेचे आयोजन करण्यात आले होते त्याची सांगता आज हभप महंत भक्तीदास महाराज (तुकाराम महाराज संस्थान बेलखंडी पाटोदा )यांच्या कीर्तनाने होणार असून सांगतेच्या कार्यक्रमानंतर भाविक-भक्तांना सरपंच भास्करराव सानप यांच्या वतीने महाप्रसादाची पंगती देण्यात येणार आहे. या पंगतीचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच भास्करराव सानप यांच्या वतीने करण्यात आले आहे. वैराग्याची महामेरू श्री संत वामनभाऊ महाराज यांची जन्मभूमी मौजे फुलसांगवी येथे प्रति वर्षाप्रमाणे श्रावण मासानिमित्त भावार्थ राम कथेचे आयोजन करण्यात आले होते. हभप. नारायण महाराज उगले यांच्या रसाळ वाणीतून राम कथा भाविक -भक्तांना श्रवण करायला मिळाली होती. यामुळे गेली महिनाभर मंदिर परिसरामध्ये मोठे भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कथेमध्ये ग्रंथाचे वाचन हभप.भाऊसाहेब महाराज उगले, महादेव महाराज इंगळे, अर्जुन महाराज नांगरे आदींनी केले होते. या भक्तिमय कार्यक्रमाची सांगता आज हभप. महंत भक्तीदास महाराज ( तुकाराम महाराज संस्थान बेलखंडी पाटोदा यांच्या कीर्तनाने होणार आहे. सांगतेच्या कार्यक्रमानंतर फुलसांगवीचे सरपंच भास्करराव सानप यांच्यावतीने किती वर्षाप्रमाणे याही वर्षी महाप्रसादाची पंगती देण्यात येणार आहे. तरी भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच भास्करराव सानप यांच्यासह, ट्रस्ट समिती व भजनी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



जालना : दिव्यांगांना अंतोदय शिधापत्रिका योजनेत समाविष्ट करून घेण्यासाठी तहसीलदार पुरवठा निरीक्षक श्री जाधव यांना भेटून तात्काळ मार्ग निकाली काढा यावेळी शिवसेना दिव्यांग आघाडी जिल्हाध्यक्ष अनिल मगदूले. शेख इस्माईल जगदीश सातपुते व आधी दिव्यांग शिवसैनिक उपस्थित होते.

# अतिवृष्टीची नुकसान भरपाई, कर्जमाफीसाठी शेकापचा गंगामसला येथे तब्बल दिड रस्ता रोको

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्ह्यासह महाराष्ट्रात गेल्या आठ दिवसापासून सतत पावसाने व अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्याच्या शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून तूर, कापूस, उडीद, मूग, बाजरी आदि पिके पावसामुळे उध्वस्त झाली आहेत तर अनेक पिके पावसाने वाहून गेली असून शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे त्यामुळे कर्जाच्या संकटात सापडलेला शेतकरी हतबल झाला असून संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या शेतीच्या नुकसानीची सरसकट एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी तसेच पिक विम्यातील जाचक अटी रद्द करुण २०२५ चा सालाचा सरसकट १००% पीक विमा लागू करण्यात यावा, शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफ करण्यात यावे,गत वर्षीचा १००% पिक विमा सरसकट वाटप करण्यात यावा, माजलगाव तालुक्यातील तलाठी,



मंडळाधिकारी यांनी सज्जावर वास्तव्यास राहुन तलाठी, मंडळाधिकारी कार्यालयातच नियमित कामकाज केले पाहिजे या मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली २३ ऑगस्ट शनिवार रोजी गंगामसला येथे सकाळी १०:३० ते १२:००वाजेपर्यंत तब्बल दिड तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले,यावेळी बोलतांना भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहुन तात्काळ अतिवृष्टीची एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई, गतवर्षीचा व चालु

### तर मंत्र्यांच्या गाड्या आडवू -भाई ॲड.नारायण गोले पाटील

हंगामातील १००% पिक विमा देऊन सरसकट कर्जमाफी करण्यात यावी अन्यथा मंत्र्यांना जिल्ह्यात फिरु देणार नाहीत असा इशारा दिला यावेळी ॲड.सय्यद याकुब, भाई मुंजा पांचाळ,भाई राहुल सोळंके,भाई सलीम पठाण,सरपंच बाळासाहेब सोळंके यांचेही भाषणे झाली त्यावेळी भाई अशोक कुलकर्णी, भाई सतिश शेजुळ, भाई चांगदेव शेजुळ,भाई भास्कर कांबळे,भाई लक्षमण अप्पा चव्हाण,उत्तम सोळंके,सुधीर सोळंके,महादेव सोळंके,पंढरीनाथ सोळंके,गणेश सोनटक्के,राजू शेख,ऋषिकेश सोळंके,विठ्ठल सोळंके,मनोज वगरे,शंकर सोळंके,प्रदीप सोळंके,पंकज पंडीत,नवनाथ धरपडे,अशोक पाढरे,नारायण सोळंके माजी ॲड.गणेश गवळीभाई अभिषेक सोळंके, भाई श्रीराम शेवाळे, जनार्दन कुदळे,शरद पायघन,अशोक माने,सुदर्शन हिवरकर,भगवान पवार,प्रभाकर खेत्री,विशाल सोळंके,विकास सोळंके,गोपाल सोळंके,लक्षमण सोळंके,चाँद शेख,पी जी सोळंके,कमलाकर सोळंके,रवि सोळंके,वसंतदादा सोळंके,नाथराव सोळंके,यूवराज सोळंके,धनंजय सोळंके,अरूण सोळंके,सचिन सोळंके,सुनिल सोळंके,शाम सोळंके,जगन्नाथ डाके,गजानन गोंडे यांच्यासह शेकडो बांधव उपस्थित होते शेवटी तहसील प्रशासनाने आंदोलकांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारले यावेळी पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता तर वाहनांच्या तब्बल दोन किलोमीटर लांब रांगा लागल्या होत्या.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिना निमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालात प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के.मुळे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के.मुळे सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रा.शिंदे पी.एस. प्रबंधक प्रशांत चव्हाण उपस्थित होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या



वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के.मुळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वाटचाली बद्दल व शैक्षणिक कार्याबद्दल माहिती दिली.तसेच यावेळी महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२४ -२०२५ मध्ये केलेल्या कार्याचा अहवाल मांडण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बी.आर बोडके यांनी केले. तर आभारप्रदर्शन डॉ.ढवळे एन.आर यांनी केले.यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.

## शेतीचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई द्या - सरपंच घुले

पाटोदा प्रतिनिधी

आठवडाभर पासून सातत्याने पावसाने हजेरी लावलेली असल्याने शेतीमध्ये पाणीच पाणी साचल्याने पीक वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी सरपंच महादेव घुले यांनी व परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

बीड अहिल्यानगर राज्य रस्त्यावरील पाटोदा तालुक्यातील मुगगाव कुसळब पिंपळवंडी सुप्पा वाहली अंतापुर चिखली चिंचोली सावरगाव घाट सौताडा घुलेवाडी भुरेवाडी सह अमळनेर सर्कल परिसरामध्ये गेल्या आठवड्यापासून पावसाने कहर केला आहे त्यामुळे सहाजिकच शेतकऱ्यांनी खते आणि अवजारे वापरून फार मोठा खर्च शेतकऱ्यांनी शेतीमध्ये केलेला आहे परंतु अचानक पावसाने शेतीचे तलावात रूपांतर झाले त्यामुळे पिके सडून हातची गेल्यात जमा झाले आहेत.

## पान ६ वरुन...

### पी. आर. कार्डचा

या निर्णयाचे स्वागत करत आ. खोतकर हेच ''आपले खरे हितचिंतक'' अशा भावना व्यक्त करून त्यांचे आभार मानले. येणारा महानगर पालिका निवडणुकीत शिवसेना उमेदवार सोबत राहणार असल्याचे महिलेने बोलून दाखवले आहे यावेळी शेख नजीर संदीप साबळे कैलास साळवे संदीप जाधव शाम नवगिरे कृष्णा तुपे विलास लहाने फकिरा गायकवाड सूरज बोर्डे पवन साळवे रवी साळवे हरिश्चंद्र लहाने शुबिद्र बाई नवगिरे सुनीता जाधव लिला बाई रत्नपारखी लता बाई नरवडे उषा बाई लहाने ज्योती दांडगे सीमा तुपे यशोदा गायकवाड आदिंची उपस्थित होते

### आज होणार संपादक

डोळसे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय आरबुणे ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर ,जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस, सचिन पवार,अविनाश कदम, जुनेद बागवान, दिलीप झगडे, संजय रानभरे, गौतम बचुटे ,कादर मकरानी , तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, मधुकर तौर, जालिंदर नन्नवरे ,अजय जोशी, हरीश यादव, विजय आरकडे, सतीश सोनवणे, मंगेश नीटूरकर, लक्ष्मण नरनाळे प्रशांत लाटकर आदींनी केले आहे.

### मराठा आरक्षण व

या माध्यमातून देण्यात आला आहे. कोटीच्या संख्येने मराठा मुंबईकडे जाणार आहेत.असा संकल्प यावेळी करण्यात आला आहे.

आज शेतकऱ्याकडे पाहण्याची सारकारची भूमिका योग्य नसून, कोणत्याही शेतीमालाला हमी भाव नाही . हमी भाव देतो म्हणून सत्येत आलेला राज्य सरकाराने सर्वच पिकाचे भाव कोलमोडून टाकले आहेत. शेतकरी पूर्ण निस्तानांभूत करण्याचे महापाप राज्य सरकार करत आहे. कर्जमाफीच्या नावाखाली सत्येत आल्यानंतर शेतकऱ्याची कर्जमाफी न केल्याचा निषेध यावेळी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आला. शेतकऱ्याचा कांद्याला योग्य भाव मिळत नसल्यामुळे राज्य सरकारच्या प्रतिमेला कांद्याचा हार घालत शेतकऱ्यांनी कांद्याच्या माळा गळ्यात घालून राज्य सरकारचा तीव्र घोषणाबाजी करत निषेध केला आहे. राज्य सरकारच्या मंत्रिमंडळात बसणरा आमदार यांना भ्रष्टाचार किती करावा याचे भान त्यांना राहिलेले नाही पण आमच्या बैलाला याचे भान आहे किती खावं पण सारकरच्या तिजोरीतील पैशाचा किती भ्रष्टाचार करावा याच भान त्या लोकप्रतिनिधीला नाही .असा प्रश्न यावेळी समाजसेवक श्री. परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी प्रसारमाध्यमाद्वारे उपस्थित केला आहे . यावेळी युवा नेते धुळाजी लकडे पत्रकार शौकत पठाण अशोक माने, महादेव लकडे ,शंकरराव घोडके, ईश्वर ओव्हाळ ,अमजद शेख,सह दै .पुढारीचे आष्टी प्रतिनिधी प्रेम पवळ उपस्थित होते.

### नीट परिक्षेत डॉ.अक्षय

खरवडे कुटुंबाची त्यांनी मान उंचवली व पुढील

पदविचे शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोलापुर व आता पदवीनंतरचे शिक्षण देखील शासकीय कॉलेज मधून च होणार असल्याचे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.नीट परिक्षेत डॉ अक्षय खरवडे यांनी घवघवीत यश मिळवल्याबदल नातेवाईक, मित्रपरिवार ,व डॉक्टर फीड, मधील सर्व सहकारी मित्रा कडून शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे.

### पिंपळवंडी येथे बैलपोळा

अवघ्या अर्ध्या तासात बैलपोळा होऊन श्री.सोमेश्वर मंदिर,मारुती मंदिर ठिकाणी शेतकऱ्यांनी बैलांना घेऊन आले.त्यावेळी केवळ ४२ बैलांचीच संख्या दिसली.पन्नाशीच्या आत संख्या आल्याने भविष्यात ही संख्या किती येईल हे भविष्य काळच ठरवेल.

### अतिवृष्टीचा मत्स्य

तलावात मत्स्यबीज सोडण्यात आले होते. या मत्स्य बीजाच्या माध्यमातून मासे तयार होण्याच्या अगोदरच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे शेती पिकांना ज्याप्रमाणे फटका बसला त्याचप्रमाणे मत्स्य व्यवसायाला ही मोठा फटका बसला आहे मासे मोठे होणे अगोदरच अतिवृष्टीने मत्स्यबीज वाहून गेले आहे. यामुळे सदरील संस्थेला मोठा फटका बसला असून लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. अनेकांच्या संसाराला हातभार लागणार होता परंतु मत्स्यबीज वाहून गेले आणि त्यांच्या हातात चे काम हिरावून घेतले आहे. त्यामुळे सदरील संस्थेला शासनाने आर्थिक मदत करावी असे मागणी संस्थेचे अध्यक्ष अशोक रुचारी व ईश्वर पाबळे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

## एसएसके अँग्रोच्या वतीने ऊस फवारणीसाठी ड्रोन उपलब्ध



युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील एसएसके अँग्रो फार्मरच्या वतीने सभासद शेतकऱ्यांसाठी ऊसावरील लोकरी मावा व इतर पिके फवारणीसाठी सवलतीच्या दरात ड्रोन उपलब्ध करून देण्यात आले असुन शेतकऱ्यांनी याचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करावी.

सध्या ढगाळ वातावरण असुन हवेमध्ये ७० ते ९५ टक्के सापेक्ष आर्द्रता असल्याने लोकरी माव्याच्या वाढीस अनुकूल वातावरण असुन याचा प्रादुर्भाव जूनपासून वाढत जाऊन सप्टेंबरमध्ये सर्वात जास्त असतो.त्यामुळे ऊसावर लोकरी माव्याचा प्रादुर्भाव वाढत असल्याने ऊस फवारणी आवश्यक आहे पण सध्या ऊसाचे पिक दमदार आल्याने ऊसाच्या आत शिरून फवारणी करणे शक्य नाही त्यामुळे ऊस फवारणीसाठी एसएसके अँग्रो च्या वतीने सभासद शेतकऱ्यांसाठी सवलतीच्या माफक दरामध्ये ड्रोन द्वारे फवारणी करण्यासाठी ड्रोन उपलब्ध केले असुन ही पद्धत पारंपरिक फवारणीपेक्षा जास्त कार्यक्षम आणि अचूक आहे कारण ड्रोन जमिनीवर न जाता हवेतून फवारणी करतात.यामुळे मातीचे नुकसान टळते आणि कमी पाणी व औषधांचा वापर करून जास्त क्षेत्रावर फवारणी करता येते त्यामुळे शेतकऱ्यांनी ऊसावरील लोकरी मावा फवारणीसाठी जास्तीत जास्त ड्रोन द्वारे फवारणी करून आपला वेळ व पैसा वाचवावा ड्रोन द्वारे फवारणीसाठी सभासद शेतकऱ्यांनी एसएसके अँग्रो मध्ये आपली नाल नोंदणी करून या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन एसएसके अँग्रोचे चेअरमन शिवराज खरबड यांनी केले आहे.

## माऊली माऊली गुरुराज माऊली च्या जयघोषात भव्य शोभायात्रा



**मन्मथ स्वामी म्हणजे श्रद्धा विश्वास व सेवेचे फळ देणारी माऊली-सद्गुरू शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर**

बीड प्रतिनिधी

श्री क्षेत्र पावन भूमी कपिलधार हे महान संत शिरोमणी व भक्तांची इच्छा व अपेक्षा पूर्ण करणारी माऊली म्हणजे मन्मथ स्वामी महाराज हे आहेत असे उद्गार शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांनी ४१ व्या अनुष्ठानाच्या सांगता प्रसंगी आपले विचार व्यक्त केले.

सद्गुरु शिवानंद शिवाचार्य तमलूरकर महाराज यांचे ४१ अनुष्ठान दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाले या अनुष्ठान सांगता प्रसंगी मनोगत व्यक्त केले, यावेळी भक्तगणांनी महाराजांची भव्य दिव्य अश्वारूढ शोभायात्रा काढण्यात आली होती .या शोभा यात्रेमध्ये महिलांनी फुगड्यांचा आनंद घेतला ,याबरोबरच मन्मथ स्वामी महाराजांच्या नामाचा गजर करत श्री मन्मथ मुक्तिधाम मठापासून मन्मथ स्वामी मंदिरापर्यंत ही सवाद्य मिरवणूक आल्यानंतर श्री मन्मथ स्वामी समाधी दर्शन घेऊन तमलूरकर महाराजांनी ४१ व्या अनुष्ठान दरम्यान जमलेल्या भाविक भक्तांना अनमोल असे मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की मन्मथ स्वामी हि कृपा करणारी माऊली आहे स्वामींची आपण मनोभावे सेवा केली तर त्याचे फळ निश्चित संत शिरोमणी मन्मथ स्वामी आपणास देतात .या ठिकाणी जमलेल्या चार राज्यातील भक्तगणांच्या असंख्य संख्येवरून असे दिसते की प्रत्यक्ष भगवान मन्मथ स्वामी महाराज यांनी आपल्या भक्त गणावर कृपाशीर्वाद केला आहे व त्यांच्या मनातील इच्छा पूर्ण केल्या आहेत, त्यांच्या सेवेचे फळ त्यांना मिळालं त्यामुळेच हा असंख्य जन समुदाय गेल्या एक महिन्यापासून या ठिकाणी आपली सेवा करत आहेत

गुरुमाऊली हे कल्पवृक्ष आहेत आपले इच्छित फळ देण्यासाठी ते सदैव भक्तांच्या पाठीशी उभे असतात फक्त आपण मनोभावे त्यांची सर्वांनी सेवा केली पाहिजे. गुरुमाऊलीच्या सानिध्यात येऊन त्यांची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे गुरुच्या आशीर्वाद लाभल्या शिवाय आपल्या जीवनात आनंद समाधान व यश हे मिळत नाही गुरुचा कृपा आशीर्वाद मिळाला की आपले जीवन आनंदी होतेच.

**विश्वनाथ आप्पा स्वामी**
**मन्मथ स्वामी देवस्थान पुजारी, कपिलधार**

# विश्वनाथ मंदिरातील शिवमहापुराण कथा सोहळ्याची सांगता

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ मंदिर याठिकाणी श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून करण्यात आले होते. तर या कार्यक्रमाची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी संपन्न झाली. या शिवमहापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस विश्वनाथ मंदिराचा परिसर गर्दीने तुडुंब भरला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे येथील वस्त्रोद्योग क्षेत्रातील नामांकित युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ शंभू महादेवाचा परिसर हा नेहमीच शिवभक्तांच्या गर्दीने भरलेला असतो. याच ठिकाणी महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकार ह.भ.प.राजाभाऊ महाराज म्हेत्रे जामखेड यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून दैनंदिन




दुपारी २ ते ५ या वेळेत करण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे सायंकाळी ५ ते ७ या वेळेमध्ये हरिपाठ व महिलांचा फुगड्यांचा यांचा कार्यक्रम देखील उत्साहात संपन्न झाला यामध्ये दररोज असंख्य महिलांनी अत्यंत उल्हासाने सहभाग घेतला होता. ज्या महिला भक्ताने अतिशय सुंदर अशा प्रकारे फुगडी खेळली त्यांना माऊली समूहाच्या वतीने दररोज एक छान व सुंदर अशी पैठणीही भेट म्हणून देण्यात आली. महाराष्ट्रातील नामांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबली आहे. याप्रसंगी हरिपाठ नेतृत्व संगीत विशारद ह.भ.प.हरिभाऊ महाराज काळे, साथ संगत गायन गंधर्व ह.भ.प.सतीश महाराज खपके, मृदंगाचार्य ह.भ.प.बाबा महाराज मुरुमकर यांची त्यांना साथ लाभली. दरम्यान शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिव महापुराणामध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिलेले असून यांविषयी सविस्तर असे वर्णन केलेले आहे. तरी वडवणीकरांसाठी हा शिवमहापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणीच ठरली आहे. या कथेची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी झाली. यादिवशी सकाळी ९ ते १० या वेळेमध्ये शिवमहापुराण कथा संपन्न झाली, त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर यांचे काल्याचे किर्तन झाले व त्यानंतर लागलीच महाप्रसादाची पंगत सुरु करण्यात आली. दरम्यान आपल्या लेखणीच्या माध्यमातून या अध्यात्मिक कार्याला अधिकतेने उजाळा देणारे वडवणी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांचाही संयोजकांनी आभार सत्कार करुन त्यांचे आभार मानले. सांगतेच्या या कार्यक्रमाला वडवणीसह पंचक्रोशीतील सर्व शिवभक्त, असंख्य मान्यवर, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिवमहापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस विश्वनाथ मंदिर परिसर गर्दीने फुलून गेला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार संयोजक विनोद विश्वासराव आसलकर, विक्की विश्वासराव आसलकर व समस्त माऊली समूह यांच्या वतीने मानण्यात आले.

cmyk

# गाई-म्हशीसाठी ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान

## शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी सरकारची योजना

राज्य सरकारच्या पशुसंवर्धन विभागाकडून गाई-म्हशी खरेदीसाठी अनुदान दिले जाते. या योजनेत सामान्य शेतकऱ्याला २ देशी/संकरीत गायी खरेदीसाठी ५० टक्के म्हणजेच ७८ हजार ४२५ रुपये अनुदान आणि २ म्हशींच्या गटासाठी ५० टक्के म्हणजेच ८९ हजार ६२९ रुपये अनुदान मिळते. अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना २ गायींसाठी ७५ टक्के म्हणजेच १ लाख १७ हजार ६३८ रुपये आणि २ म्हशींसाठी ७५ टक्के म्हणजेच १ लाख ३४ हजार ४४३ रुपये अनुदान मिळते. योजनेंतर्गत उर्वरित रक्कम शेतकऱ्याने स्वतः भरावी लागते. जर शेतकऱ्याला कर्ज घ्यायचे असेल, तर सामान्य शेतकऱ्याने उरलेली पूर्ण ५० टक्के रक्कम स्वतः द्यायची असते. पण अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना उरलेली २५ टक्के रक्कम बँकेकडून कर्जरूपाने मिळते आणि त्यांना प्राधान्य दिले जाते. याशिवाय, शेतकऱ्यांना जनावरांच्या संगोपनाचे प्रशिक्षण, पशुवैद्यकीय सेवा आणि कर्ज मिळवण्यासाठी शासनाची मदत मिळते. त्यामुळे दुग्धव्यवसाय करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळून व्यवसाय सुरू करणे सोपे होते.

योजनेचा उद्देश : राज्यातील ग्रामीण भागातील सर्वसाधारण, अनुसूचित जाती-जमाती, महिला आणि बेरोजगार तरुणांना शेतीसोबत दुग्धव्यवसाय सुरू करून स्थिर उत्पन्न मिळवून देणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे हा आहे.



योजनेच्या अटी : लाभार्थी निवडताना ३० टक्के महिला आणि ३ टक्के दिव्यांगांना प्राधान्य दिले जाईल. एका कुटुंबातील केवळ एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ मिळेल. निवड झाल्यानंतर लाभार्थ्याने एक महिन्याच्या आत स्वतःचा हिस्सा भरावा, त्यानंतर शासन उर्वरित रक्कम अनुदान स्वरूपात देईल. लाभार्थ्याने किमान ३ वर्षे दुग्धव्यवसाय करणे बंधनकारक आहे. जनावरांसाठी योग्य जागा, गोठा, चारा आणि पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. दुग्धव्यवसाय व गो/म्हैसपालनाचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. जनावरांची खरेदी सरकार मान्यताप्राप्त किंवा पशुसंवर्धन विभागाने अधिकृत केलेल्या केंद्रातूनच करणे गरजेचे आहे.

पात्रता : महाराष्ट्रातील रहिवासी असणे आवश्यक. अनुसूचित जाती, जमाती, महिला, बेरोजगार तरुणांना प्राधान्य. जनावरांसाठी जागा, गोठा, चारा व पाणी उपलब्ध असणे आवश्यक

कागदपत्रे : आधारकार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, बँक पासबुकची सत्यप्रत, फोटो ओळखपत्राची सत्यप्रत, ७/१२ सातबारा, ८अ उतारा, अपत्य दाखला किंवा स्वयंघोषणा पत्र, रेशनकार्ड किंवा कुटुंब प्रमाणपत्र (एकाच कुटुंबातील एकालाच लाभ), ७/१२ मध्ये नाव नसल्यास कुटुंब संमतीपत्र किंवा भाडेकरार, अनुसूचित जाती/जमातीचा दाखला (असल्यास अनिवार्य), दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र, दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र, बचत गट सदस्य असल्यास प्रमाणपत्र किंवा बँक पासबुकची प्रत, प्रशिक्षण घेतल्यास प्रमाणपत्राची प्रत. अर्जाची तपासणी व निवडीनंतर अनुदान मंजूर केले जाते. यासाठी तालुका पशुसंवर्धन अधिकारी कार्यालय किंवा जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक कार्यालय यांच्याशी संपर्क करावा.

# राज्यातील जमीन मोजणीची प्रकरणे आता तातडीने निकाली लागणार

### नवीन १२०० रोव्हर उपलब्ध झाल्याने कामाला येणार गती



पुणे : राज्यातील जमीन मोजणीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी तसेच मोजणी अचूक करण्यासाठी राज्य सरकारने भूमिअभिलेख विभागाला १२०० नवीन रोव्हर मशीन खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे रोव्हर मशीनची संख्या एकूण संख्या जवळपास तीन हजारांपर्यंत जाणार आहे. सध्या भूमिअभिलेख विभागाकडे राज्यभरात मोजणीदारांची (भूकरमापक) एकूण संख्या जवळपास ४ हजार ६०० इतकी आहे.

भूमिअभिलेख विभागात सध्या १ हजार ७०२ रोव्हर मशीन आहेत, तर कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार एकूण चार हजार रोव्हर मशीनची गरज आहे. एक हजार २०० रोव्हर खरेदी करण्यास मान्यता मिळावी, असा प्रस्ताव सरकारकडे सादर केला होता. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यात बैठक झाली. त्यात रोव्हर खरेदीसाठी १३२ कोटी आणि भूमिअभिलेख विभागाच्या नवीन इमारतीच्या बांधकामांसाठी १ हजार ६०० कोटी रुपयांच्या निधीला मान्यता मिळाली.

त्यानुसार पुढील वर्षी आणखी एक हजार रोव्हर खरेदी करण्याचे नियोजन आहे, असे भूमिअभिलेख विभागाकडून सांगण्यात आले. राज्यात ई-मोजणी २.० प्रणाली लागू केली आहे. त्यामुळे जमीन मोजणी नकाशाची क प्रत डिजिटल स्वरूपात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. या कामाला गती देण्यासाठी चार हजार रोव्हरची आवश्यकता आहे. मोजणीसाठी जीपीएस रीडिंग घेण्यासाठीचा वेळ कमी करण्यासाठी विभागाने सर्व्हे ऑफ इंडियाच्या मदतीने राज्यात ७७ ठिकाणी कॉर्स (कंटिन्यूस ऑपरेशन रेफरन्स स्टेशन) उभारले आहे. या कॉर्स आधारे जीपीएस रीडिंग केवळ ३० सेकंदांत घेता येते. कॉर्सचे रीडिंग रोव्हर रिसिव्हरमार्फत टॅबमध्ये घेता येते. त्यामुळे कमी वेळेत आणि अचूक मोजणी करण्यास मदत होते.

# जनावरांना चांगला संतुलित आहार

शेतकऱ्यांचा जोडधंदा म्हणून दूध व्यवसायाकडे पाहिले जाते. तसंच बहुतांश शेतकऱ्यांचा आर्थिक उदारनिर्वाह हा दूध व्यवसायावर अवलंबून असतो. यामुळे शेतकरी पशुची उत्तम काळजी घेतात. तसंच जनावरांचे दूध उत्पादन हे त्यांच्या आहारावर अवलंबून असल्याने खासकरुन शेतकरी त्याकडे जास्त लक्ष देतात. जनावरांना चांगला संतुलित आहार, हिरवा चारा, तेलाची पोळी आणि अन्य आहार दिल्यास जनावरांमधील दूध उत्पादन वाढते. यासोबतच त्यांची प्रतिकारशक्तीही मजबूत असते. यासाठी संतुलित आहाराचा मुद्दा महत्वाचा ठरतो. यासोबतच कृषी तज्ज्ञ चांगल्या दर्जाच्या दूध उत्पादनासाठी जनावरांच्या आरोग्यासाठी मोहरीचे तेल देण्याची शिफारस करतात.



जनावरांना मोहरीचे तेल देण्याचे फायदे : आजारी आणि दुर्बल प्राण्यांना मोहरीचे तेल दिल्याने त्यांच्या आरोग्यात चमत्कारीक बदल होतात. मोहरीच्या तेलात भरपूर चरबी असते. ज्यामुळे प्राण्यांना ऊर्जा मिळते आणि ते चपळ होतात. त्यामुळे गायी आणि म्हशींना मोहरीचे तेल देण्याची प्रथा आहे, जेणेकरून त्यांचे आरोग्य लवकर चांगले होईल. मोहरीचे तेल प्यायल्याने जनावरांची पचनशक्ती बळकट होते. त्यामुळे जनावरांना पोटासंबंधीचे आजार होत नाहीत. पशुंना मोहरीचे तेल दिल्याने वासरांची तब्बेत देखील सुधारते. थकलेल्या जनावरांना मोहरीचे तेल थोडेसे देणे फायदेशीर ठरते. विशेषत: लांबच्या प्रवासानंतर जनावरे येतात किंवा खरेदी करून आणली जातात. अशा स्थितीत अशक्तपणा आणि थकवा आल्याने ताप येण्याची शक्यता असते. अशा वेळी मोहरीचे तेल दिल्यास प्राण्यांमध्ये लगेच ऊर्जा येत. मोहरीचे तेल जनावरांना खूप उपयुक्त असते.

उन्हाळ्यात उष्णतेपासून सुरक्षा : उन्हाळ्यात जनावरांची काळजी घेणे खूप गरजेचे असते. त्यासाठी पशुपालक देखील पशुची मोठ्या प्रमाणात काळजी घेतात. तसंच उन्हाळ्यात जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन दिल्यास जनावरांना उष्णता संबंधित समस्यांपासून संरक्षण मिळते. दुसरीकडे जर आपण हिवाळ्याबद्दल बोललो तर, या दिवसात मोहरीचे तेल देखील प्राण्यांमध्ये उष्णता टिकवून ठेवण्यासाठी एक फायदेशीर कृती असल्याचे सिद्ध होते. पशुतज्ज्ञांच्या मते निरोगी जनावरांना मोहरीचे तेल आणि पशुखाद्य रोज देऊ नये. या गोष्टी फक्त आजारी आणि अशक्त प्राण्यांसाठीच चांगल्या आहेत.

तेल देण्याचे प्रमाण : दरम्यान, आजारी व अशक्त जनावरांना १०० ते २०० मिली मोहरीचे तेलही दिले जाऊ शकते. यापेक्षा जास्त सेवन करणे जनावरांसाठी हानिकारक ठरू शकते. त्याचबरोबर गाई-म्हशींच्या पोटात वायू किंवा पचन खराब झाल्यास पशुवैद्यांच्या सल्ल्याने ४०० ते ५०० मिली मोहरीचे तेलही द्यावे. यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन द्यावे. अन्यथा जनावरांना अन्य आजारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

# कागदी लिंबू हस्त बहराचे नियोजन

कागदी लिंबाच्या तीन बहरांपैकी फक्त हस्त बहरातील फळे उन्हाळ्यात उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे झाडावर हस्त बहर जास्तीत जास्त येण्याची आवश्यकता असते. हस्त बहरातील १५ टक्के फुलधारणा सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यांत होते. या बहराची फळे मार्च ते मे महिन्यात काढणीस येतात. हस्त बहराच्या फळांना आंबिया बहराच्या फळांपेक्षा ६ ते ८ पट आणि मृग बहराच्या फळांपेक्षा ३ ते ४ पट भाव मिळतो. म्हणून हस्त बहर घेणे अधिक फायदेशीर ठरते. मात्र हा बहर सहज घेता येत नाही. कारण सप्टेंबर-ऑक्टोबर पूर्वी पावसाळा असल्याने झाडांना अपेक्षित ताण बसत नाही. म्हणून हस्त बहर घेण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनातून फळबागेचे व्यवस्थापन आवश्यक आहे. यात मशागत, खत- पाणी व्यवस्थापन तसेच संजीवकांचा योग्य वापर करून हस्त बहराची हमखास फुलधारण होण्यासाठी आतापासून प्रयत्न करणे गरजेचे आहे. लिंबूवर्गीय फळझाडांना बहर येण्याकरिता झाडांची वाढ करणारी अन्नद्रव्ये (कर्ब-नत्र) वाढीकरिता खर्च न होता, अन्नद्रव्यांचा संचय होणे जरुरी आहे. अन्नद्रव्यांचा संचय झाडाच्या फांद्यांमध्ये प्रमाणबद्ध झाल्यानंतर पोषक हवामान मिळताच, बहराची फुले नवतीसोबत दिसू लागतात.



हस्त बहराचे नियोजन : लिंबू झाडावर मृग बहराची फळे नसावीत. याकरिता झाडाला मृग बहर न येण्याची सवय लावणे जरुरी आहे. असे केल्यामुळे मृग बहराची फळधारणा होणार नाही किंवा कमी प्रमाणात होऊन नियमित हस्त बहर येत राहील. जिब्रेलिक ॲसिड या संजीवकाच्या वापरामुळे मृग बहर फुटण्यास प्रतिरोध होऊन मृग बहरात फुलधारणेऐवजी झाडाची शाखीय वाढ होते. मृग बहराची फुले उशिरा म्हणजे जून-जुलै ऐवजी, ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत म्हणजेच हस्त बहरात फुटण्यास मदत होईल. याकरिता जून महिन्यात जिब्रेलिक ॲसिड (५० पीपीएम) ५ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी घ्यायला हवी. १ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या कालावधीत पाण्याचा ताण द्यावा. ताण कालावधीत पाऊस येत असल्याने अपेक्षित ताण बसत नाही. यासाठी १५ सप्टेंबर दरम्यान क्लोरमेक्वाट क्लोराइड १ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. (ॲग्रेस्को शिफारस) आवश्यकतेनुसार पुन्हा १५ दिवसांनी हीच फवारणी करावी.

अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन : सहा वर्षे व त्यावरील झाडाकरिता शेणखत ४० किलो आणि नत्र ६०० ग्रॅम आणि स्फुरद व पालाश प्रत्येकी ३०० ग्रॅम प्रति झाड प्रमाणे द्यावे. प्रति झाड ४० किलो शेणखत आणि त्याबरोबर ७.५ किलो निंबोळी ढेप द्यावी. पावसामुळे शेणखत जमिनीत चांगले कुजते. त्यामुळे सूक्ष्म अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. पाण्याचा ताण तोडताना, प्रति झाड ३०० ग्रॅम नत्र, ३०० ग्रॅम स्फुरद आणि ३०० ग्रॅम पालाश द्यावे. उरलेली नत्राची ३०० ग्रॅम मात्रा फुले आल्यापासून साधारणपणे एक महिन्याने द्यावी. हा काळ फळांच्या वाढीचा असल्यामुळे झाडाची नत्राची गरज वाढते. ताण दिल्यानंतर बहर येण्याकरिता व फुलगळ रोखण्याकरिता अन्नद्रव्यांची त्वरित उपलब्धता होणे आवश्यक असते. मातीतून दिलेली अन्नद्रव्ये झाडांना त्वरित उपलब्ध होत नाही. याकरिता ऑक्टोबर महिन्यात ताण तोडताना १० ग्रॅम पोटॅशिअम नायट्रेट (१३:०:४५) प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यामुळे नत्र व पालाशची आवश्यकता त्वरित पूर्ण करता येते. फुलधारणेच्या काळात झाडाला आवश्यक सूक्ष्म अन्नद्रव्ये मुख्यतः झिंक व बोरॉन यांची उपलब्धता योग्य प्रमाणात असल्यास अपेक्षित परिणाम होतो. फूल गळण्यावर नियंत्रण मिळते. याकरिता झिंक पाच ग्रॅम आणि बोरॉन तीन ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ताण तोडताना माती परीक्षणानुसार चिलेटेड सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी. फुलधारणेच्या काळात झाडांस आवश्यक असलेल्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची मुख्यतः झिंक आणि बोरॉन यांची उपलब्धता योग्य प्रमाणात केल्यास फुलधारणा होऊन फुलगळतीवर नियंत्रण मिळण्यास मदत होते.

बागेचे व्यवस्थापन : वाफ्यातील ओलावा टिकविण्याकरिता ५ सेंमी जाडीचा वाळलेल्या गवताचा थर द्यावा. त्यामुळे जमिनीचे तापमान संतुलित राहून प्रत्येक महिन्याला एका पाण्याच्या पाळीची बचत होते. पावसाळ्यापूर्वी आणि नंतर झाडाच्या बुंध्याला २ ते ३ फुटांपर्यंत बोर्डो पेस्ट लावावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

७९ : ७९ई.पुर्व : इटलीतील माउंट व्हेसुव्हियस ज्वालामुखीचा उद्रेक. पॉम्पेई, हर्क्युलेनियम स्टेबी ही शहरे राखेखाली दडपली जाऊन नष्ट.
१४५६ : जर्मनीतील मेन्झ येथे जोहान्स गुटेनबर्ग यांनी बायबल ग्रंथाच्या छपाई काम पूर्ण केलं.
१६०८ : ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचा पहिला प्रतिनिधी सुरत येथे दाखल झाला.
१६९० : कोलकाता शहराची स्थापना.
१६९९ : ईस्ट इंडिया कंपनीने विकत घेतलेल्या कोलकाता शहराला प्रेसिडेंसी शहर म्हणून विकसित करण्यास सुरुवात केली तेव्हा त्यांनी त्या शहराचे नाव बदलून कलकत्ता असे ठेवले.
१८७५ : कॅप्टन मॅथ्यू व्हेब इंग्लिश खाडी पोहणारे पहिला व्यक्ती ठरले.
१८९१ : थॉमस अल्वा एडिसनने चलचित्र कॅमेर्याचे पेटंट घेतले.
१९५० : एडिथ सॅम्पसन हा संयुक्त राष्ट्रात जाणारा पहिला कृष्णवर्णीय अमेरिकन प्रतिनिधी ठरला.
१९३६ : ऑस्ट्रेलियन अंटार्क्टिक प्रदेश तयार करण्यात आला.
१९६६ : रशियन बनावटीचे लूना-११ हे मानवविरहित यान चांद्रमोहिमेवर निघाले
१९६९ : भारतीय राजकारणी नेते वी. वी. गिरी यांची भारताच्या राष्ट्रपती पदी निवड करण्यात आली. ते भारताचे चौथे राष्ट्रपती होते.
१९७४ : साली श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात काँग्रेस नेता फखरुद्दीन अली अहमद यांची भारताच्या पाचव्या राष्ट्रपती पदी नियुक्ती करण्यात आली.
१९९१ : युक्रेनने स्वत:ला (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र घोषित केले.
१९९५ : मायक्रोसॉफ्टने विंडोज ९५ ही संगणकप्रणाली प्रकाशित केली.
१९९८ : एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका या जगप्रसिद्ध विश्वकोशाच्या आयातीवर भारत सरकारने बंदी घातली.
२००१ : सरोद वादक अमजद अली खान यांना मध्य प्रदेश सरकारचातानसेन पुरस्कार जाहीर.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३३ : गुजराथी लेखक समाजसुधारक नर्मदाशंकर दवे ऊर्फ नर्मद यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८८६)
१८७२ : केसरी वृत्तपत्राचे संपादक तसेच कायदेमंडळाचे सभासद न. चिं. केळकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑक्टोबर १९४७)
१८८० : निरक्षर पण प्रतिभावान कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा जन्म. (मृत्यू: ३ डिसेंबर १९५१)
१८८८ : स्वतंत्र भारतातील मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री बाळ गंगाधर खेर यांचा जन्म. (मृत्यू: ८ मार्च १९५७)
१८८८ : मार्टिन बेकर एरिक कंपनी चे सहसंस्थापक वेलेंटाइन बेकर यांचा जन्म. (मृत्यू: १२ सप्टेंबर १९४२)
१९०८ : क्रांतिकारक शिवराम हरी राजगुरू यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९१७ : किराणा घराण्याचे गायक पं. बसवराज राजगुरू यांचा जन्म.
१९१८ : केन्द्रीय परराष्ट्रमंत्री सिकंदर बख्त यांचा जन्म. (मृत्यू: २३ फेब्रुवारी २००४)
१९२० : पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील किराणा घराण्याचे प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. बसवराज राजगुरू यांचा जन्मदिन.
१९२७ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ हॅरी मार्कोवित्झ यांचा जन्म.
१९२७ : भारतीय अभिनेत्री आणि निर्मात्या अंजली देवी यांचा जन्म.
१९२९ : यासर अराफत नोबेल पारितोषिक विजेते पॅलेस्टाईनचे नेते (मृत्यू: ११ नोव्हेंबर २००४)
१९३२ : रावसाहेब गणपराव जाधव मराठीतील व्यासंगी साहित्यसमीक्षक. 'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळा'चे तिसरे अध्यक्ष व 'मराठी विश्वकोशा'चे प्रमुख संपादक (२००१ २००३).
१९४४ : संयुक्ता पाणिग्रही ओडीसी नर्तिका (मृत्यू: २४ जून १९९७)
१९४५ : डब्ल्यू.डब्ल्यू.ई.चे सहसंस्थापक विन्स मॅकमेहन यांचा जन्म.
१९४७ : पॉलो कोहेलो ब्राझिलियन लेखक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२५ : सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर संस्कृत पण्डित, प्राच्यविद्या संशोधक, भाषाशास्त्रज्ञ, इतिहास संशोधक व समाजसुधारक (जन्म: ६ जुलै १८३७)
१९६७ : कैसर शिपयार्ड आणि कैसर एल्युमिनियम चे संस्थापक हेन्री जे. कैसर यांचे निधन. (जन्म: ९ मे १८८२)
१९६८ : आधुनिक भारताचे अग्रगण्य विचारवंत आणि सामाजिक वैज्ञानिक, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्रचे प्राध्यापक तसचं, लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू राधाकमल मुखर्जी यांचे निधन.
१९९३ : शतायुषी क्रिकेटमहर्षी प्रा. दिनकर बळवंत तथा दि. ब. देवधर प्रथमश्रेणीचे ६२ सामने, १०० डाव, ११ वेळा नाबाद, ९ शतके, ३९५१ एकूण धावा, ४४.३९ सरासरी. भारत सरकारतर्फे त्यांना पद्मश्री (१९६५) व पद्मविभूषण (१९९१) या पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. (जन्म: १४ जानेवारी १८९२)
२००० : कल्याणजी वीरजी शाह सुमारे तीन दशके रसिकांवर आपल्या सुरावटीची मोहिनी घालणार्या 'कल्याणजी-आनंदजी' या संगीतकार द्वयीतील ज्येष्ठ बंधू (जन्म: ३० जून १९२८)
२००८ : चिनी भाषेमधील कवी, लेखक, पत्रकार वै वै यांचे निधन.
२०१८ : जॉन मैककेन, जॉन सिडनी मॅककेन तिसरा हा एक अमेरिकन राजकारणी व ॲरिझोना राज्यातून वरिष्ठ सेनेटर.(जन्मतारीख: २९ ऑगस्ट, १९३६)
२०१९ : भारताचे केंद्रीय अर्थमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अरुण जेटली यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १९५२)

# स्थानिक आपत्तीचा निकष वगळल्याने अग्रीम नुकसान भरपाई बंद !

## पीक विमा कंपन्यांचे दलाल सरकारच शेतकऱ्यांच्या मुळावर; पुर्वीप्रमाणेच ''ट्रेगर'' करण्यात यावेत डॉ. ढवळे

बीड। प्रतिनिधी

अगोदरच पीक विमा कंपनीकडून शेतकऱ्यांना विमा भरपाई देण्यात चालढकल होत असतानाच, पीक विमा कंपन्यांचे दलाल झालेले राज्य सरकार शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे. पीक विमा योजनेतून नुकसानभरपाईसाठी पात्र असलेले स्थानिक आपत्तीमुळे झालेले नुकसान, काढणीपूर्व किंवा काढणीनंतर झालेले नुकसान, पेरणी न झाल्याने झालेले नुकसान हे महत्वाचे निकषच वगळण्यात आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर पंचनामा करून मिळणारी २५ टक्के अग्रीम रक्कम आता मिळणार नाही.

सरकारने नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या असल्या तरी स्थानिक आपत्तीचे ''ट्रेगर'' रद्द केल्याने आठवडाभरात झालेल्या नुकसान भरपाईची मागणी पीक विम्यातून होणारच नाही. त्यामुळे सरकारने संकटाच्या काळात नियमित हक्काची मदत २५ टक्के अग्रिम देण्यासाठी पुर्वीप्रमाणेच ''ट्रेगर'' सुरू करावेत, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना करण्यात आली असून, सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.



### वांझोट्या पंचनाम्याचा शेतकऱ्यांना उपयोग काय?

या आठवड्यात जिल्ह्यात पावसाने घातलेल्या धुमाकूळामुळे शेकडो हेक्टरवरील खरीप पिके उद्ध्वस्त झाली आहेत. शेतकरी या नुकसानीचे फोटो काढून तक्रार करत आहेत. मात्र हे ट्रेगरच उपलब्ध नसल्याने या तक्रारीचा काहीही उपयोग होणार नाही. मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पंचनामे करून अहवाल पाठवण्याच्या सूचना केल्या असल्या तरी मागचा अनुभव लक्षात घेता, शासनाची मदत केव्हा मिळेल याचा नेम नाही. त्यामुळे या वांझोट्या पंचनाम्याचा शेतकऱ्यांना काहीही उपयोग नाही.

### शासनाचा बदललेला निकष ; शेतकरी हवालदिल

राज्य शासनाने पिक विम्याच्या संदर्भाने स्थानिक आपत्तीचा निकष बदलल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. पीक विमा म्हणजे शेतकऱ्यांचे सुरक्षा कवच समजले जात होते. पूर्वी विमा योजनेत ४ ''ट्रेगर'' होते. सलग ३ आठवडे पावसाने दडी मारली आणि पिके करपली. अतिवृष्टीमुळे पिके वाहून गेली, पिके पाण्यात बुडून नासली, तक्रारीनंतर पंचनामा करून २५ टक्के अग्रिम दिले जात असे. यामुळे शेतकऱ्यांचा खर्च निघत असल्याने दिलासा मिळत असे. पण विमा कंपन्यांनी सत्ताधाऱ्यांना हाताशी धरून ''अतिवृष्टी'' व ''कोरडे ट्रेगर'' वगळून फक्त पीक कंपनी हा एकमेव ट्रेगर ठेवला आहे.

# गुरु माऊलींच्या आशीर्वादाने भगवंतापर्यंत जाता येते

## शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांचा अमृत उपदेश



बीड । प्रतिनिधी

आपल्या जीवनामध्ये गुरुचे स्थान हे उच्चतम स्थान आहे. गुरुच्या अनुग्रहा शिवाय भगवंतप्राप्ती होत नाही. गुरु अनुग्रह देतात व आपल्या जीवनातील अंधकार दूर करतात गुरुच्या आशीर्वादा वरच भगवंताची प्राप्ती होते, असे अनमोल विचार श्री. १०८ प.पू.ष.ब्र शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांनी दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी येथे आयोजित शिष्यांना उपदेश पर प्रवचनामध्ये अनमोल विचार प्रतिपादित केले.

आपल्या प्रवचन सेवेमध्ये प.पू.ष.ब्र. शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर

यांनी गुरु सेवा, भगवंत सेवा व आपल्या जीवनात गुरुचे अनन्य महत्त्वाचे स्थान आहे हे सांगताना महाराजांनी श्रोत्यांना ज्याप्रमाणे मातीचा माठ बनवण्यासाठी मातीची गरज आहे, सोन्याचे दागिने बनवण्यासाठी सोन्याची गरज आहे, त्याप्रमाणे आपल्या जीवनात भगवंत प्राप्तीसाठी गुरुची नितांत आवश्यकता आहे हे उदाहरण देऊन स्पष्ट केले. आपण आपल्या जीवनात सदाचारी रहा, कोणाचीही निंदा करू नका, व्यसन करू नका आणि भगवंताची मनोभावे सेवा करा असा सल्लाही दिला. श्री क्षेत्र कपिलधार परिसर म्हणजे संजीवन समाधीस्थ श्री. मन्मथ स्वामी महाराज यांच्या पावन पदस्पर्शाने पुनीत झालेली ही पावन भूमी आहे. आपण नशीबवान आहोत या पावनभूमीमध्ये आपला जन्म झाला व या पावन भूमीचा आपणास दररोज पदस्पर्श होत आहे. भगवंताचे आभार माना आणि आपल्या जीवनामध्ये आनंदी राहा कोणाची निंदा करू नका. व्यसनापासून दूर राहा, भगवंताची सेवा करा, यामुळे आपल्या जीवनामध्ये परिवर्तन तर होईलच परंतु सद विचाराने व गुरुच्या आशीर्वादाने आपले जीवन फुलाप्रमाणे सुगंधी होईल, असे जमलेल्या प्रवचन सेवेला आलेल्या आपल्या शिष्यगणांना सांगितले. या प्रवचन सेवेला उदलवडगाव, शिवाजीनगर, ससेवाडी, कपिलधारवाडी, कोळवाडी, आदी परिसरातून भाविक भक्त व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. शेवटी दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडीचे ह.भ.प. वैजनाथ महाराज शिंदे यांनी श्री. १०८ प.पू.ष.ब्र शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांचा शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

# बीडमध्ये भूसंपादन भ्रष्टाचार ; २० संचिकांवर कारवाईस टाळाटाळ

## वंचित बहुजन आघाडीची संतप्त भूमिका; उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ यांची काढणार प्रतिकात्मक अंत्ययात्रा

बीड । प्रतिनिधी

मा. उपजिल्हाधिकारी भूसंपादन (ल.पा.), बीड कार्यालयातील तब्बल २० संचिकांमध्ये झालेल्या गंभीर भ्रष्टाचाराची चौकशी होऊनही आजतागायत दोषींवर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून होत असलेली ही टाळाटाळ आता जनतेच्या रोषाला कारणीभूत ठरली आहे. यावर वंचित बहुजन आघाडीने संतप्त भूमिका घेतील असून, उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ यांची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढण्यात येणार आहे.

पूर्वी दाखल झालेल्या तक्रारीनुसार जिल्हाधिकारी बीड यांनी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे यांच्याकडून सखोल चौकशी करून अहवाल विभागीय आयुक्तांकडे पाठविण्याचे निर्देश दिले होते. मात्र धक्कादायक बाब म्हणजे ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत त्याच अधिकाऱ्यांच्या हस्ते अहवाल तयार करून सादर करण्यात आला. यानंतर १३ डिसेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी बीड यांना अहवालातील त्रुटी दूर करण्यास सांगण्यात आले होते. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी वेळोवेळी स्मरणपत्रे पाठवली, अगदी ०६.०३.२०२५ रोजी पुन्हा चौकशी करून अहवाल मागवला. तरीही बीड जिल्हाधिकारी कार्यालयाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही. यामध्ये उपजिल्हाधिकारी (जा.प्र.) सतीश धुमाळ यांची भूमिका संशयास्पद असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे मत आहे. ते फाईल पुढे न नेता प्रकरण दडपविण्याचे काम करत असल्याचा स्पष्ट आरोप करण्यात आला आहे. जनतेत भावना निर्माण झाली आहे की, ''लोकसेवेच्या नावाखाली काम करणारे हे अधिकारी प्रत्यक्षात मृत आहेत'' असे उपहासात्मक वक्तव्य जनतेतून व कार्यकर्त्यांतून होत आहे. याच संतापातून वंचित बहुजन आघाडी, बीड जिल्ह्याच्या वतीने उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ यांची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही अंत्ययात्रा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून जिल्हाधिकारी कार्यालय, बीड या मार्गावर काढण्यात येणार असून, प्रशासनाच्या ''जिवंत मृत'' अवस्थेविरोधातील जनतेचा तीव्र संताप आणि उपहास यातून व्यक्त केला जाणार आहे. वंचित बहुजन आघाडीने स्पष्ट केले आहे की, जर प्रशासनाने तातडीने दोषींवर कारवाई केली नाही, तर पुढील आंदोलन आणखी तीव्र स्वरूप धारण करेल.

# कालिंका बलभिम गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी युवराज धोंडगे

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील नावाजलेले श्री कालिंका बलभिम गणेश मंडळाची बैठक ज्येष्ठ मार्गदर्शक शेखर जवकर, अंबादास नवले, वसंत कदम, दत्ता व्यवहारे, सचिन जवकर,अमोल काळे,अ‍ॅड.सुधिर जाधव, अजित कदम,धर्मेश कदम,प्रविण साळुंके,शितल राऊत, मनोज नवले, सुनील कोकाटे, चंदन दातवाणी, अमरापूरकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली जवकर मंगल केंद्र बलभिम चौक येथे नुकतीच बैठक संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते श्री कालिंका बलभिम गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी युवराज धोंडगे, उपाध्यक्षपदी अंकुश कुकडेजा, सह उपाध्यक्ष विनय नवले, सचिवपदी अमित कदम, कोषाध्यक्षपदी गणेश कदम, सह काषाध्यक्षपदी अभिषेक नवले तर व्यवस्थापक पदी आकाश व्यवहारे यांची निवड करण्यात आली.

श्री कालिंका बलभिम गणेश मंडळाचे यंदाचे ५९ वे वर्ष असून यंदा गणेशोत्सव काळात विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार जाणार आहेत. श्री कालिंका बलभिम गणेश मंडळाने यापूर्वी समाजात जनजागृतीसाठी बेटी बचाव..बेटी पढाव, झाडे लावा..झाडे जगवा, पाणी अडवा, पाणी जीरवा, एचआयव्ही जनजागृती, रक्तदानाचे महत्व, देशभरातील प्रसिध्द तिर्थक्षेत्र असे विविध देखाव्याचे सादरीकरण केले आहे. या मंडळाने सलग १० वर्षे देखाव्याचे प्रथम पारितोषीक पटकाविलेले आहे. सन २०२४ च्या गणेशोत्सव काळात उत्कृष्ट मिरवणूकीबद्दल जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालया मार्फत प्रथम पारितोषिक मिळाले असून यंदाच्या गणेशोत्सवात देखील उत्कृष्ट देखाव्याचे सादरीकरण व भव्य अशी मिरवणूक काढण्याचा संकल्प मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. श्री कालिंका बलभीम गणेश मंडळाच्या नुतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल विशेष अभिनंदन बीड जिल्हा शिवसेना उपजिल्हा प्रमुख अजय जाधव, श्रीमंत गोतावळे, संन्मत्ती पोरवाल, संदीप जाधव, प्रा.विजय जाधव, संतोष कदम, कामेश जवकर, नाचरे सर, सार्थक कदम, स्वयंम नवले, यश जवकर, समर्थ नवले, तुपकर, आसाराम सोनवणे यांच्यासह सर्व गणेश भक्तांनी केले आहे.

# तेलगाव येथे विद्यापीठ वर्धापन दिन

बीड। प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय तेलगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा वर्धापन दिन संस्थेचे सचिव डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यापीठाच्या ध्वजाचे ध्वजारोहण महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य खेत्रे बी. एल कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य चवार बी.एस. यांच्या हस्ते करण्यात आले.राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत घेण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य खेत्रे बी.एल यांनी विद्यार्थ्यांना विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ गणेश खेमाडे, प्रा.अनंता सोळुंके, प्रा कंधारे, प्रा , सोनवणे, सो कसबे मॅडम, प्रा मुंडे, प्रा फाळके, शेख ताजुद्दीन, श्री सुरज कुरे, श्री सतीश राऊत, बंडू नाईकवाडे व क्षीरसागर मामा यांचे सह राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केएसके महाविद्यालयात राष्ट्रीय आंतराळ दिन साजरा



बीड। प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,बीड येथे आज दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी भौतीकशास्त्र विभाग,विज्ञान मंडळ आणि राष्ट्रीय छात्रसेना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आंतराळ दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास बलभीम महाविद्यालयातील भौतीकशास्त्र विभाग प्रमुख प्रा.बी.टी. ताटे सर हे उपस्थित होते. ताटे सर यांनी आपल्या व्याख्यानात म्हणाले की, भारतीय आंतराळ संस्था आणि आंतरराष्ट्रीय आंतराळ संस्था फार जोमाने कार्य करत आहे. या मध्ये भारताचे जगतील स्थान त्यांनी आधोरेखित केले. भारतीय आंतराळ विषयी त्यांनी पावर पॉंईटच्या माध्यमातून अत्यंत सुलभपणे महत्व समजावून सांगीतले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य तथा भौतीकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी सांगीतले की, भारताने जगामध्ये आंतराळ संशोधनात पाचवा क्रमांक निश्चित केला असून संशोधनात भरारी घेतली आहे. चंद्रयान मोहीमेमध्ये भारत देश जगात चौथ्या क्रमांकावर आहे.ही बाब अभिमानास्पद आहे.यावेळी उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो.अशोक डोंगरे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कॅप्टन बालासाहेब पोटे यांनी तर पाहुण्यांचा परिचय प्रा.शिवाजी राऊत व आभार रूपेश कोकाटे यांनी मानले.यावेळी कॅप्टन अकुलवार, प्रा.कॅप्टन जाधव हे उपस्थित होते. या कार्यक्रमास एनसीसीचे विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मिल्लिया महाविद्यालयात विद्यापीठाचा वर्धापनदिन साजरा



बीड। प्रतिनिधी

येथील मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात दिनांक २३ ऑगस्ट २०२५, शनीवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर चा ६७ वा वर्धापनदिन मोठया उत्साहात संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांच्या शुभहस्ते सकाळी ०८:२० वाजता विद्यापीठ ध्वजारोहण करण्यात आले. विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधुन शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. फारूक सौदागर यानी आपले विचार व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी डॉ. शामल जाधव यांनी व्यसन मुक्तीची शपथ दिली.या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. हुसैनी एस. एस.,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर रमेश वारे, प्रा. शोएब पिरजादे, प्राध्यापिका डॉ. शामल जाधव, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ.अब्दुल अनिस, करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. मोहम्मद आसेफ इकबाल, ग्रंथपाल डॉ. आमेर सलीम, कार्यालय अधीक्षक श्री. शेख मोहम्मद रिझवान, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी- विद्यार्थिनी, सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# परळीच्या विकासासाठी जनआंदोलनाची हाक

परळी। प्रतिनिधी

परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील २१० मेगावॅट क्षमतेचे तीनही विद्युत संच तांत्रिकदृष्ट्या सक्षम असतानाही शासनाने बंद केले. तर, २५० मेगावॅट क्षमतेच्या संच क्रमांक ९च्या उभारणीसाठी माजी मंत्री धनंजय मुंडे आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा करूनही मुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. शासनाच्या या दुर्लक्षामुळे परळीवासीयांमध्ये असंतोष निर्माण झाला असून, आता जनआंदोलन उभारण्याशिवाय पर्याय नसल्याचा ठाम इशारा परळीतील सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. मनोज संकाये यांनी दिला आहे.

२१ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली परळीत एकदिवसीय धरणे आंदोलन पार पडले. या आंदोलनाला भेट देऊन अ‍ॅड. संकाये यांनी आंदोलकांच्या मागण्यांना आपला ठाम पाठिंबा जाहीर केला. यावेळी ते म्हणाले, ''परळीच्या सर्वांगीण विकासासाठी संच क्रमांक ९ची उभारणी ही केवळ गरज नाही तर अपरिहार्यता आहे. शासनाने वारंवार आश्वासने देऊनही प्रत्यक्षात काम सुरु केले नाही. त्यामुळे परळीकरांच्या संयमाचा अंत होत असून, लोकशक्तीच्या जोरावर व्यापक जनआंदोलन छेडले जाईल.''या आंदोलनाला परळी



वीज निर्मिती कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन, व्यापारी महासंघ, तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, विविध ग्रामपंचायती, डॉक्टर असोसिएशन, पत्रकार संघ, शासकीय व अर्धशासकीय संस्था तसेच अनेक सामाजिक संघटनांचा उत्स्फूर्त पाठिंबा लाभला.संकाये यांच्या आरोपांमुळे मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, परळीतील वीज प्रकल्पासंदर्भातील दुर्लक्षावरून पुढील काळात आंदोलनाची ठिणगी भडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संच क्रमांक ९च्या उभारणीचा प्रश्न आता केवळ परळीचाच नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्यातील विकासाचा प्रश्न ठरणार आहे.


**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अंबड ता. अंबड जि जालना**

**दुरध्वनी क्रमांक: ७०२४८३-२२००२६**

**जा.क्र.२०२५/जमा-२/कावी - ६१**

E-Mail ID: tahsildararmbad@gmail.com

**दिनांक- १८/०८/२०२५**

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस जाहीर प्रकटन देऊन कळविण्यात येते कि, मौजे. बारसवाडा ता. अंबड जि. जालना येथील सर्वे नं. ७१ मधील २१ एकर जमीन हैद्राबाद कुळ कायद्या प्रमाणे वारसाने पांडुरंग म्हसुजी खंडागळे यांच्या नावे होणे बाबत दिनांक. २८/०८/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता ठेवण्यात आली आहे. तरी सदर तारखेस आपण स्वतः किंवा वकिलामार्फत दाखल करावयाच्या पुराव्यासह तहसिल कार्यालय अंबड येथे हजर राहावे सदर तारखेस आपण गैरहजर राहीलात तर आपणाला काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून एकतर्फी निर्णय देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत**
तहसीलदार अंबड


# बीड शहरांतर्गत रस्त्यांवर हवाई वाहतूक सेवा सुरू करा

## एस.एम.युसूफ़, रमेशराव गंगाधरे यांची ना. अजित पवार यांच्याकडे उपहासात्मक मागणी

बीड। प्रतिनिधी

शहरांतर्गत रस्त्यांवर हवाई वाहतूक सेवा सुरू करण्यात यावी. अशी उपहासात्मक मागणी एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, आपण बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारण्याच्या अनेक वर्षांपूर्वीपासून बीड शहरातील काही रस्ते अत्यंत वाईट अवस्थेत आहेत. यामुळे या रस्त्यांवरून ये-जा करताना पादचाऱ्यांसह सायकलस्वार, दुचाकी चालक, तीन चाकी, चार चाकी वाहनांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यामुळे अनेकांना पाठदुखी आणि मानदुखीचा त्रास उद्भवत



आहे. अशा त्रासदायक रस्त्यांमध्ये बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस-कारंजा टॉवर-बलभीम चौक-जुना बाजार मार्गे चांदणी चौकापर्यंतचा रस्ता. राजुरी वेस ते बुंदेलपुरा-कबाडगल्ली मार्गे माळी वेस पोलीस चौकी पर्यंतचा रस्ता. कारंजा टॉवर ते जुनी भाजी मंडई मार्गे बुंदेलपुरा पर्यंतचा रस्ता. बलभीम चौक ते धोंडीपुरा मार्गे माळीवेस पर्यंतचा रस्ता. नगर रोड ते पालवण चौकापर्यंतचा धानोरा रस्ता आणि बलभीम चौक ते बलभीम कॉलेज, मिल्लिया शाळा-कॉलेज, काली मस्जिद-भीम नगर-कागज़ी दरवाज़ा परिसरातील रस्त्यांचा मुख्यत्वे समावेश आहे.

या सर्व रस्त्यांसाठी आतापर्यंत अनेक समाजसेवकांनी, संघटनांनी, विरोधी राजकीय पक्षांनी सुद्धा वेळोवेळी शासन-प्रशासनाला निवेदने देवून आवाज उठविला आहे. तसेच वेगवेगळ्या प्रकारे आंदोलनेही केलेली आहेत. परंतु याचा काही एक परिणाम लोकप्रतिनिधींसह शासन किंवा प्रशासनावर होत असल्याचे दिसत नाही. यामुळे वर उल्लेख केलेले सर्व रस्ते गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत बकाल अवस्थेत गेले आहेत. फुटा-फुटावर या रस्त्यांवर खड्डेच खड्डे पडले आहेत. या रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या नाल्यांची ही वाईट अवस्था आहे. एकाही प्रशासकीय अधिकाऱ्याने किंवा बीड नगर परिषदेने किंवा कोणत्याही लोकप्रतिनिधीने या खितपत पडलेल्या रस्त्यांचे पूर्णतः नूतनीकरण करणे तर दूर या रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्याची सुद्धा तसदी घेतली नाही. म्हणून वर उल्लेख केलेले सर्व रस्ते व नाल्यांचे काम जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत या सर्व रस्त्यांवर हवाई वाहतूक सुरू करावी. जेणेकरून खराब रस्त्यांच्या एका टोकावर हवाई वाहतूक यानात (छोटे हेलिकॉप्टर किंवा तत्सम यान) बसून दुसऱ्या टोकावर ये-जा करणे नागरिकांना सोपे जाईल म्हणून शक्य तितक्या लवकर वर उल्लेख केलेल्या सर्व रस्त्यांवर रस्ते व नाल्या चांगल्या होईपर्यंत हवाई वाहतूक सेवा आणि तीही विनामूल्य सुरू करावी, अशी उपहासात्मक मागणी करण्यात आली आहे.

# अजितदादा अपंग- आश्रम शाळांच्या संस्था चालकांची झाडाझडती घ्याच

## पाच वर्षे काम करूनही अनेक शिक्षक वाऱ्यावर ,ऐनवेळी बदलतात याद्या

**बीड । प्रतिनिधी**

**बीडचे पालकमंत्री पद अजितदादा पवार यांच्याकडे आल्यापासून बीडमध्ये अनेक गोष्टीत सुधारणा होत आहे. प्रशासनही आता हळूहळू तळ्यावर येत आहे. शिस्तीचे नेते म्हणून अजित दादांकडे पाहिले जाते. बीड जिल्ह्यामध्ये अपंग शाळा आणि आश्रम शाळांचा तमाशा चालू आहे त्यांच्याकडे जरा पालकमंत्री अजित दादांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे पाच पाच वर्षे काम करूनही ऐनवेळी शाळेला ग्रँड आल्यानंतर शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या याद्या बदलल्या जातात. आणि या बाबीचे समाज कल्याण विभागाला काही देणे देणे नसते. त्यामुळे अनेक शिक्षक ,कर्मचारी हे देशोधडीला लागले आहेत. विनावेतन काम करूनही त्यांच्या पदरी निराशाच पदरी पडल्याने अनेकजण आत्महत्येच्या तयारीत**

बीड जिल्ह्यामध्ये अपंग आणि आश्रम शाळांचे मोठे पेव आहे. या अपंग आणि आश्रम शाळेत मोठ्या प्रमाणात कर्मचारी काम करतात. विद्यार्थी संख्या किती आहे हे पाहिले जात नाही. समाज कल्याण विभागाकडून कुठल्याही शाळेला भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली जात नाही. मागच्या वर्षी जे कर्मचारी होते ते संस्थेला ग्रँड आल्यानंतर कसे काय बदलले जातात हा मोठा प्रश्न कर्मचाऱ्यांना पडत आहे .अनेक जण पाच पाच वर्षे काम करूनही त्यांना ऐनवेळी शाळेतून काढून टाकले जाते .अशा अनेक तक्रारी आहेत. या कर्मचाऱ्याकडून पैसे घेतल्याचे बोलले जात आहे. अनेकांचे पैसे घेऊन त्यांना नोकरीवर वरून काढून टाकण्याचे काम संस्थाचालकांनी केल्याने त्यांना आत्महत्या शिवाय पर्याय राहिला नाही. या अपंग शाळांची तपासणी वेळेवर होत नाही. शाळा भरतात की नाही ?या शाळेत विद्यार्थी किती आहेत ?ते शाळेत येतात की नाही? या सर्व बाबींची तपासणी वेळेवर झाली तर या शाळा व्यवस्थित चालतील .आणि संस्थाचालक हे सरळ होतील मात्र आज संस्था चालकाला कुठलाही लगाम नाही समाजकल्याण विभागाच्या मदतीने हे संस्था चालक काहीही करायला तयार असतात. अनेक संस्थांमध्ये तर शाळा बंद असतानाही वेतन दिल्याच्या धक्कादायक बाबी समोर येत आहेत .कुठलीही संस्था चालू करताना आणि कर्मचारी भरती करताना त्याची जाहिरात वर्तमानपत्रांमध्ये येणे गरजेचे आहे. मात्र या संस्थांच्या जाहिराती कुठल्याही वर्तमानपत्रात दिसत नाहीत. नेमके कुठल्या वर्तमानपत्र त्यांच्या जाहिरात येतात तेच कळत नाही. काहीजण तर जाहिरातीही देत नाहीत .मात्र समाज कल्याण विभागाकडून त्यांना मान्यता देण्यात येते .आणि शिक्षकांचे पगारही वेळेवर होतात .हे सर्व आर्थिक देवाण घेवाणीतून होत असल्याची चर्चा आहे .आता बीड जिल्ह्यामध्ये हळूहळू शिस्त लागत आहे. पालकमंत्री अजित पवार यांनी समाज कल्याण विभागाकडे ही जरा लक्ष देऊन यांची झाडाझडती घ्यावी आणि समाज कल्याण विभागाने अपंग आणि आश्रम शाळांच्या संस्था चालकांना लगाम घालावा अशी मागणी जनतेतून होत आहे. समाज कल्याण विभागाच्या कामाकडे शक्यतो कोणाचे लक्ष नसते .याचा फायदा घेऊन अपंग शाळांचे संस्थाचालक मनमानी करत आहेत. त्यामुळे अनेक घटना घडत आहेत .अनेक कर्मचारी आणि शिक्षकांनी आत्महत्या केलेल्या आहेत. अनेक जण आत्महत्येच्या मार्गावर आहेत. या संस्थाचालकाकडून शिक्षकांची ही लूट चालू आहे. शिक्षकांच्या पगारांमध्येही काही संस्था चालक पक्षाचे पैशाची मागणी करतात. हे आता उघड उघड सर्रास चालू आहे. या सर्वच बाबीवर आता लगाम घालण्याची गरज आहे .आणि हा लगाम फक्त अजित दादा पवारच घालू शकतात अशी जनतेची खात्री आहे .त्यामुळे अजितदादांनी या विभागाकडे लक्ष देऊन नेमके काय चालले आहे .याची सखोल चौकशी करावी अशी मागणी या संस्थांचे पीडित शिक्षक आणि नागरिकातून होत आहे.

### संस्थाचालकाच्या त्रासाला कंटाळून कर्मचाऱ्याची आत्महत्या

परळी तालुक्यातील नंदागौळ येथील रहिवाशी श्रीनाथ गोविंद कराड वय २५ याने वसंतनगर प्राथमिक आश्रमशाळेच्या संस्थाचालकाच्या त्रासाला कंटाळून राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केली. तो मागील १२ वर्षांपासून शिपाई म्हणून याठिकाणी काम करत होता. मात्र त्याला कायम करून घेतले जात नव्हते, आर्थिक आणि मानसिक संकटात असलेल्या या शिपायाने शेवटी आत्महत्या केली. त्याचे वडील केज येथील या संस्थेच्या शाळेत शिक्षक म्हणून अनेक वर्षे कार्यरत होते. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# भटक्या कुत्र्यांप्रमाणे मुलींची छेड काढणाऱ्या रोडरोमियोंची पण नसबंदी करा-सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी



समाजात मुलींच्या छेडछाडीच्या वाढत्या घटनांनी असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी धाडसी भूमिका घेतली असून सुप्रीम कोर्टाने भटक्या कुत्र्यांच्या नसबंदीचा घेतलेला निर्णय दाखल देत, मुलींची छेडछाड करणाऱ्या रोडरोमिओं ची पण नसबंदी करून कठोर कारवाई व्हावी, अशी कठोर व धाडसी भूमिका सचिन मुळूक यांनी मांडली.

शहर असो वा ग्रामीण भाग, मुलींच्या छेडछाडीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. शाळा-महाविद्यालयीन तरुणींना वर्गात जाताना, बाजारात खरेदी करताना, अगदी प्रवासादरम्यानही रोडरोमिओंच्या टोमण्यांना वागणुकीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर, मानसिकतेवर आणि आयुष्यावर थेट परिणाम होत आहे. बीडसह राज्यभरात पोलिसांकडून रोडरोमीओंवर कारवाई करण्यात येत असली तरी मुलींच्या छेडछाडीचे प्रकार सुरुच आहेत. रोडरोमिओंना थांबवण्यासाठी कायदे आहेत, परंतु त्यांची अंमलबजावणी किती प्रभावी होते हा मोठा प्रश्न आहे. मुलींच्या सुरक्षिततेशी खेळणाऱ्यांना रोखण्यासाठी केवळ कायदे करणे पुरेसे नाही. मोकाट कुत्र्यांप्रमाणेच मुलींना त्रास देणाऱ्या रोडरोमिओंचीही नसबंदी करायला हवी. तेव्हाच अशा प्रकारांना आळा बसेल आणि मुलींना निर्भयपणे समाजात वावरण्याची मोकळीक मिळेल,'' असे मुळूक यांनी म्हटले आहे.

# मराठा आरक्षणाच्या लढ्यामध्ये सामील व्हा -संदीप खाकाळ

आष्टी । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी पोटतिडकीने सरकारकडे मांडून देखील वेळ काढूपणा होत असल्याने सकल मराठा समाज मनोज जरांगे याच्या नेतृत्वाखाली मुंबई ला जाणार आहे. या ऐतिहासिक लढ्याचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्खेने सहभागी होण्याचे आवाहन शिवनेरी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदीप खाकाळ यांनी केले आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील हे लढत आहेत. पण सरकार यातून पळवाट काढून पुढचा ओढा दाखवत असल्याने मराठा समाजावर अन्याय होत आहे. लाखो मराठा युवक नोकरीविना आजही घरी बसून आहेत. आता मराठ्यंना आरक्षण मिळावे आणि मिळलेच पाहिजे. ही ठाम भुमिका घेऊन सरकारला घाम फोडण्यासाठी मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहेत. या आरक्षण लढ्यात लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संदीप खाकाळ यानी केले आहे.

# पी. आर. कार्डचा प्रश्न मार्गी लागला

## आ. अर्जुन खोतकर यांनी दिलेला शब्द पूर्ण केला -विष्णू पाचफुले

जालना । प्रतिनिधी



जालना शहरातील २५ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीधारकांना पी. आर. कार्ड मिळवून देण्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्तक्षेपाने हा ऐतिहासिक निर्णय झाला. या निर्णयाची घोषणा होताच राहुल नगर येथे शहर शिवसेनेच्यावतीने शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले यांच्या उपस्थितीत महिलेने फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोष करत आ. खोतकर यांचे आभार मानले आहे श्रीमंत संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप साबळे यांनी आमदार अर्जुन खोतकर यांच्याकडे राहुल नगर येथील झोपडपट्टी धारकांना पी आर कार्डाचा प्रश्न मार्गी लावावा केली होती

झोपडपट्टीवाशीयांच्या आयुष्याशी निगडित असलेल्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आ. खोतकर अनेक वर्षांपासून सातत्याने प्रयत्नशील होते. अगर त्यांनी हा प्रश्न मार्गी लावल्याने राहुल नगर या झोपडपट्टी भागातील महिलेने फटाके फोडून पेढे वाटप करत जल्लोष केला. यावेळी उपस्थित नागरिकांनी ◀◀ पान ३ वर

# आज होणार संपादक गावरस्करांचा सन्मान सोहळा

## डॉ. लहाने, माजी मंत्री क्षीरसागर, एस.एम. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती

बीड । प्रतिनिधी






बीड जिल्ह्याचे सुपुत्र ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर अण्णा यांना मराठी पत्रकार परिषदेचा नागोजीराव दुधगावकर स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचा भव्य नागरी सत्कार आज दिनांक २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता जालना रोडवरील हॉटेल अन्वीता येथे पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या सत्कार सोहळ्याची गावरस्कर प्रेमी आणि मराठी पत्रकार परिषद पदाधिकाऱ्याकडून जय्यत तयारी झाली आहे. या सत्कार सोहळ्याला जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री डॉ .तात्यासाहेब लहाने, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्यासह सर्व सन्माननीय संपादक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे माजी विभागीय सचिव दिलीप खिस्ती, ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी, विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास ◀◀ पान ३ वर

# अनिल जाधव-आत्माराम वाव्हळ यांना जननेता सन्मान २०२५ पुरस्कार जाहीर

**१५ ऑक्टोबर २०२५ रोजी मान्यवरांच्या हस्ते होणार वितरण!**

बीड । प्रतिनिधी





सायं दैनिक जननेताच्या प्रथम वर्धापन दिना निमित्ताने माजी सैनिक सोपानराव दादा गायकवाड यांच्या स्मरणार्थ विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कार्य करणार्या गुणवंत व्यक्तींना जननेता सन्मान २०२५ पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी दै.लोकतंत्रचे उपसंपादक अनिल जाधव,शिदोड येथील शिक्षक आत्माराम वाव्हळ सर यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

सायं दैनिक जननेताच्या प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने माजी सैनिक सोपानराव दादा गायकवाड यांच्या स्मरणार्थ विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना जननेता सन्मान २०२५ हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाणार आहे. यात सहभागी असणारे शैक्षणिक, सामाजिक आणि पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची जननेता सन्मान २०२५ या पुरस्कारासाठी करण्यात आल्याची माहिती निवड समितीचे प्रमुख संपादक नंदू गायकवाड यांनी दिली. सदर पुरस्काराचे वितरण दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. सदरील दैनिक जननेता सन्मान २०२५ पुरस्कार मिळाल्याबद्दल अनिल जाधव ,आत्माराम वाव्हळ सर यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पाटोद्यात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट,रस्त्यावर दहशत

पाटोदा । प्रतिनिधी



पाटोदा शहरात सध्या मोकाट कुत्र्यांची संख्या खुप मोठ्या प्रमाणावर झाली असुन अशा मोकाट कुत्र्यांनी अनेकांना चावा घेतला असुन लहान मुले व महीला वर्गात यामुळे एक प्रकारचे भितीचे वातावरण पसरले आहे.

पाटोदा शहरात सध्या मोकाट कुत्र्यांची संख्या खुप मोठ्या प्रमाणावर झाली असुन अनेक कुत्रे पिसाळलेले आहेत.अशा मोकाट कुत्र्यांनी अनेक लहान मुलांना व महीलांना चावा घेतला असुन लहान मुले व महीला वर्गात यामुळे एक प्रकारचे भितीचे वातावरण पसरले आहे. ही मोकाट कुत्रे अगदी मेन रस्त्यावर पसरलेली व थांबलेले असतात. लहान मुलांना व महीलांना रस्त्याने वागणे अशा मोकाट कुत्र्या मुळे मुश्किल झाले आहे. लहान मुलांचे तर शाळेत जाणे मुश्किल झाले आहे. पाटोदा नगर पंचायत कार्यालयाने याची दखल घेऊन अशा मोकाट फिरास्त्या कुत्र्याचा काहीतरीं बंदोबस्त करावा अशी मागणी जनतेतून होत आहे.

# नीट परिक्षेत डॉ.अक्षय खरवडे यांचे घवघवीत यश

तलवाडा प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून दीड वर्षापासून तलवाडा पंचक्रोशीतील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून रुजू झाल्यापासून डॉ अक्षय खरवडे , यांनी चांगल्या पद्धतीने गोरगरीब रुग्णांना सेवा देत आहे. ते रुजू झाल्यापासून दीडशे ते २०० ची ओपीडी रोज तलवाडा प्रथमिक आरोग्य केंद्रात होत आहे. गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील खेड्यातील रुई गावातील शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या डॉ अक्षय खरवडे यांनी

नीट पीजी २०२५ या पदव्युत्तर शिक्षणासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत ८०० पैकी ५५५ गुण मिळवत देशात १००३९ रँक पटकावून घवघवीत यश मिळवले ◀◀ पान ३ वर

# पिंपळवंडी येथे बैलपोळा उत्साहात साजरा

**आधुनिक यांत्रिकिकरणाच्या वापराने बैलांची संख्या घटली**

**पिंपळवंडी गावात पोळा सणाला ४२ बैलांची हजेरी**

पिंपळवंडी । प्रतिनिधी



पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.बैलांचे घरी पूजन करून त्यांना पुरणपोळी खाऊ घातली.अलीकडच्या काळात शेतामध्ये आधुनिक यांत्रिकीकरणाचा जास्त प्रमाणात वापर होऊ लागल्याने शेतकऱ्यांकडे बैल जोडी संख्या काळाच्या ओघात नगण्य झाली आहे. त्यामुळे त्याचा परिणाम बैल पोळा सणावर जाणवला.शेती म्हटले की, शेतकऱ्यांकडे पशुधन असणारच पण अलीकडे शेतकऱ्यांकडे दूध दुभते व व्यवसायासाठी गाई व म्हशी,शेळी पालन केले जात आहे.अलीकडे शेत मशागतीसाठी बैलाऐवजी ट्रॅक्टर व अन्य यांत्रिकीकरण अवजारांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊन त्यामुळे शेतातील मशागतीचे कामे कमी वेळात होऊन शेतकऱ्यांना पशुधन सांभाळणे कठीण झालेले आहे. बैलाची जागा यांत्रिकीकरणाने घेतल्याने बैलाची संख्या घटली आहे. त्याचा परिणाम पिंपळवंडी येथे बैलपोळा सणात पहावयास मिळाला.

# अतिवृष्टीचा मत्स्य व्यवसायालाही फटका

## नुकसान भरपाई देण्याची मागणी; अशोक रुचारे, ईश्वर पाबळे यांचे निवेदन

बीड । प्रतिनिधी



तालुक्यातील घोडका राजुरी, जरुड, बिंदुसरा धरण या तलावात टी किशोर मत्स्य को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने मत्स्यबीज टाकण्यात आले होते परंतु अतिवृष्टीमुळे हे अतिवृष्टीने बीज वाहून गेले असून संस्थेला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे सदरील संस्थेला नुकसान भरपाई देण्यात यावी असे मागणी संस्थेचे अध्यक्ष अशोक भेवन रुचारे व ईश्वर पाबळे यांनी एका निवेदनाद्वारे केली मागणी आहे.

बीड तालुक्यात अनेक वर्षापासून टी किशोर मत्स्य को-ऑपरेटिव्ह सोसायटी काम करत आहे. या संस्थेच्या माध्यमातून तलावात मत्स्यबीज सोडून माशाचे उत्पादन केले जाते या माशांमुळे अनेकांच्या हाताला काम मिळते. गोरगरीब लोक पोट भरतात तलावातील मासे पकडून ते विक्री केले जातात. या माध्यमातून कुठे रुपयाची उलाढाल होते व गोरगरिबांचा संसार याच व्यवसायाच्या माध्यमातून चालतो, परंतु यावर्षी अतिवृष्टीचा फटका या व्यवसायाला बसला असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. टी किशोर मत्स्य को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने बीड तालुक्यातील बिंदुसरा धरण घोडके, राजुरी तलाव व जरूर येथील ◀◀ पान ३ वर

# मराठा आरक्षण व शेतकरी विरोधी भूमिका घेणाऱ्या राज्य सरकारचा निषेध

## सुलेमान देवळा येथे बैलपोळा सण आगळावेगळा साजरा

म्हसोबावाडी । प्रतिनिधी




आष्टी तालुक्यात हिंदू संस्कृतीचा व शेतकऱ्याचा पवित्र सण असणाऱ्या बैल पोळ्याच्या सणानिमित्त, आष्टी तालुक्यातील मोजे सुलेमान देवळा परिसरातील समविचारी मित्र परिवार एकत्र येत मराठा आरक्षण विषयी व राज्य सरकारची असणारी उदासीन भूमिका, शेतकऱ्याच्या मालांला मिळत नसलेला हमी भावाचा निषेध करत बैलं पोळा सण साजरा करण्यात आला आहे. याविषयी सविस्तर माहिती असे की, गेल्या अनेक वर्षापासून मराठा आरक्षण ओ.बी.सी. प्रयोगातून भेटण्यासाठी, मराठा योद्धा माननीय श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात खाली सकल मराठा समाज २९ ऑगस्टला मुंबई येथे आझाद मैदानावर आंदोलनासाठी जात असून, राज्य सरकार याची दक्षता घ्यावी. व सकल मराठा समाजाने मुंबईच्या दिशेने मोठ्या संख्येने यावे हा एक संदेश ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canal Road Beed, Tal. Dist Beed 431122 (maharashtra) Published at Editor Seema Bhimrao Maske, (mokashe) Executive Editor Subhash Vilasrao Chaure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# स्वच्छ सर्वेक्षणात महानगरपालिकेसोबत लोकप्रतिनिधी, नागरिक, स्वयंसेवी संस्था अशा सर्वांचे एकत्रितपणे प्रयत्न आवश्यक - उपमुख्यमंत्री अजित पवार

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड शहराची ओळख ही औद्योगिक नगरी तसेच कामगारांची, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून देखील आहे. परंतु आता पिंपरी चिंचवड शहराला स्वच्छ, हरित आणि समृद्ध शहर आपल्याला बनवायचे आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये या शहराला अव्वल स्थान मिळवण्यासाठी महापालिकेसोबत लोकप्रतिनिधी, नागरिक, स्वयंसेवी संस्था अशा सर्वांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले,यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक ती मदत देण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

भारत सरकारच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत घेतलेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड शहर देशात सातवे तर राज्यात प्रथम क्रमांकाचे शहर ठरले आहे. याशिवाय शहराला ७ स्टार कचरामुक्त शहर व वॉटर-प्लस प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. याबद्दल पिंपरी चिंचवड महापालिकेला केंद्र शासनाने पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. या यशामध्ये सहभाग घेऊन योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान व स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या पुर्वतयारीचा प्रारंभ आज चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.



याप्रसंगी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य ड. गोरक्ष लोखंडे, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उपायुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, माजी महापौर योगेश बहल, माजी उपमहापौर राजू मिसाळ, माजी नगरसदस्य नाना काटे, प्रशांत शितोळे, नारायण बहिवरे, पंकज भालेकर, शाम लांडे, उत्तम शेट्टी, स्वाती उर्फ माई काटे, माजी नगरसदस्य, नगरसदस्या, विविध सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आर.आर.आर. सेंटर डॅशबोर्ड प्रणाली, शून्य कचरा प्रकल्प डॅशबोर्ड प्रणाली, स्वच्छ शौचालय प, स्वच्छता सर्वेक्षण २०२५-२६ मॅस्कॉट व घोषवाक्याचे तसेच हरित सेतू प्रकल्प बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. या प्रकल्पांबाबत माहिती देणारी तसेच महापालिकेच्या वतीने पर्यावरण विषयक राबवण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती देणारी चित्रफित यावेळी दाखवण्यात आली.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ ठेवण्यासाठी शहरातील सर्व नागरिकांनी साथ दिली तर आपले शहराच्या देशात पहिल्या तीन मध्ये नक्कीच क्रमांक मिळेल. या पद्धतीने नियोजन करून त्यादृष्टिने आजपासूनच कामाला सुरुवात करूया. शहरातील लोकसंख्या वाढत असताना, नागरिकरण वेगाने होत असताना आपण शहराच्या स्वच्छतेला देखील महत्त्व देण्याची आवश्यकता आहे. स्वच्छतेची सुरुवात ही स्वत:पासून करणे गरजेचे आहे. महापालिका शहर स्वच्छ रहावे, यासाठी प्रयत्न करीत असतेच. परंतु त्याला शहरातील नागरिक, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था अशा सर्वांचीच साथ गरजेची असते, असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले. पिंपरी चिंचवड शहरात दररोज १ हजार ४०० टन कचरा निर्माण होतो. लोकांचे राहणीमान बदलत असताना कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे, याकडेही लक्ष देण्याची गरज असल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, देशात स्वच्छता सर्वेक्षणात इंदोर शहर प्रथम येते, यामध्ये तेथील नागरिकांचा वाटा महत्त्वाचा आहे. पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी देखील त्यादृष्टिने महापालिकेस सहकार्य करावे. अनेकदा आपण जेव्हा परदेशात जातो, तेव्हा तेथील नियम पाळतो. कचरा रस्त्यावर, उघड्यावर टाकत नाही. कारण दंड होईल अशी भिती असते. परंतु भारतामध्ये हे नियम पाळत नाही. भारत ही आपली मातृभूमी आहे. येथेच आपल्याला पुढची पिढी घडवायची आहे. अशा वेळी आपल्या शहरात देखील स्वच्छता राहील, याकडे प्रामुख्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्याची सुरुवात स्वत:पासून करावी, असे आवाहनही त्यांनी केले. खासदार श्रीरंग आप्पा बारणे म्हणाले, पिंपरी चिंचवड शहरात घनकचरा व्यवस्थापन करण्यास चांगले प्राधान्य दिले आहे. नागरिकांना चांगल्या सेवा मिळाव्यात, यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सातत्याने प्रयत्न करीत असते. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाला नागरिकांनी देखील सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. शहरात आगामी काळात पवना, इंद्रायणी, मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम पूर्ण होईल. परंतु हे करीत असताना नद्यांच्या स्वच्छतेकडे लक्ष द्यावे, असेही खासदार बारणे यांनी सांगितले

## फॅमिली फ्रेंड म्हणून घरी आला आणि घरातल्या इज्जतीवरचपुण्यातली चीड आणणारी घटना

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात गुन्हेगारीच प्रमाण कमी नाहीय. तिथे चोरी, दरोडा, हत्या, वाहनांची तोडफोड, छेडछाड असे गुन्हे घडतच असतात. आता त्याच पुण्यात एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. माणुसकीला लाज आणणार हा प्रकार आहे. ज्याला मित्र म्हणून घरी आणलं, त्यानेच दगा दिला. घरातल्या इज्जतीवर हात टाकला. फॅमिली फ्रेंडच्या या घृणास्पद कृत्याने सगळ्या पुण्याला धक्का बसला आहे. पुण्यातील भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत माणुसकीला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. कुटुंबाचा जवळचा मित्र असलेल्या एका नराधमाने तब्बल सहा वर्षे आपल्या मित्राच्या मुलीचं लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.




पोलिसांनी या प्रकरणी ४४ वर्षीय आरोपीला अटक केली आहे. २०१९ साली फिर्यादी त्यावेळी केवळ १९ वर्षांची होती, तेव्हापासून हा अत्याचार सुरू झाला. आरोपी व फिर्यादीचं कुटुंब परस्परांच्या चांगल्या ओळखीचे असल्यामुळे आरोपी सतत फिर्यादीच्या घरात ये-जा करायचा. याचाच गैरफायदा घेत त्याने तिच्यावर अत्याचार करण्यास सुरुवात केली. २०१९ मध्ये फिर्यादी घरात कपडे बदलत असताना आरोपीने तिचे गुपचूप फोटो मोबाईलमध्ये टिपले. नंतर हे फोटो दाखवत ते व्हायरल करण्याची धमकी दिली आणि त्याचा वापर करून तो वारंवार तिच्यावर शारीरिक अत्याचार करू लागला.

## पिंपरी-चिंचवडमध्ये मास्क मॅनची दहशत! भर दिवसा हातात चाकू घेऊन फिरला अन्...

पुणे । प्रतिनिधी



पुण्यातील गुन्ह्यांचे आणि पर्यायाने दहशतीचे वातावरण वाढतच असून विद्येचे माहेरघर असलेले हे शहर आता एक नवी, क्रूर ओळखं मिळवतंय की काय अशा घटना एकापाठोपाठ एक घडतच आहेत. कधी स्वारगेट बस अत्याचार, तर कधी ड्रिंक अँड ड्राईव्ह करत निष्पापांना उडवणं असो किंवा तरूणांची नशेत अश्लील कृत्य असोत. पुण्याचं नाव दिवसेंदिवस बदनाम होत चाललंय. हेच कमी की काय म्हणू भरदिवसा हल्ले, मारमारी, खूनही होत आहेतच. नुकताच पिंपरी चिंचवडमध्ये एका मास्क मॅनची दहशत पाहायला मिळाली.

पिंपरी चिंचवडमध्ये एका मास्क मॅनची दहशत पाहायला मिळाली. हा मास्क मॅन दिवसाउजेडी पिंपरी चिंचवड येथे हातात चाकू घेऊन फिरताना दिसला. शहरातील लोकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी या मास्क मॅनने धारधार चाकू हातात घेतला आहे.

## बीआरटी बसने एका तरुणाला धडकून चिरडले




पिंपरी चिंचवड प्रतिनिधी

पुणे महानगरपालिका पीएमपीएल बस सुसाट गाड्यांना कोणत्याही प्रकारचा ब्रेक नाही म्हणले तरी चालेल कारण पुणे परिवहन महामंडळाच्या सर्व सिटी बस रस्त्यावरून धावत असताना वेगाची मर्यादा किंवा ट्रॅफिक सिग्नल याची मर्यादा कोणतेही नियम बस चालक पाळत नाहीत हे या अपघातामधून स्पष्ट होत आहे एखादा प्रवासी एखाद्या बस स्टॉप ला उतरणार असेल तर ती बस अचानक ब्रेक मारून जागेत थांबते व मागून येणाऱा दुचाकीस्वार असेल फोर व्हीलर चालक असेल त्यांना अचानक ब्रेक मारावे लागते व एका पीएमपीएल बस मुळे पाठीमागे अनेक गाड्यांच्या धडका बसल्या जातात या पी एम पी एल च्या बसेस वर नक्की कारवाई कोण करणार हा प्रश्नचिन्हच आहे ना यांना गती ना ब्रेक ना मर्यादा जसे की हे महाराष्ट्र सरकारचे जावईच असल्यासारखे बस चालक पी एम पी एल ड्रायव्हर चालवतात ते कुठले सिग्नल चे नियम पाळत असतील असे कुठेही निदर्शनास येत नाही सुसाट पीएमपीएल बस चालक बस

## अभियोग्यता चाचणीत गोंधळ, विद्यार्थ्यांचा आक्रोश; १८७ विद्यार्थ्यांना शून्य मार्क

पुणे । प्रतिनिधी

शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी (टेट) परीक्षेचा निकाल लावण्यास आधीच विलंब केला आहे. त्यात आता १८७ विद्यार्थ्यांना ० मार्क पडल्याने विद्यार्थी आश्चर्य व्यक्त करीत आहेत. शुभदा बागूल या विद्यार्थिनीने १९९ प्रश्न सोडवले होते, तरीही शून्य मार्क मिळाले आहेत. विशेष म्हणजे २०२२ च्या टेट परीक्षेत १०३ मार्क मिळाले होते. आता अधिक अभ्यासपूर्ण परीक्षा देऊनही ० मार्क कसे? असा प्रश्न उपस्थित केला आहे. याबाबत पुरावे हाती लागत असून, लवकरच कोर्टात जाऊ, असा इशारा विद्यार्थी प्रतिनिधींनी दिला आहे.




टेट परीक्षेचा निकाल सोमवारी ( दि. १८ ) जाहीर झाला आहे. त्यामध्ये अनेक विद्याथ्यर्थ्यांना मागील परीक्षेवेळी जेवढे गुण मिळाले तेवढेच गुण यावेळीही मिळाले आहेत. काही विद्यार्थ्यांना सन २०२२ मध्ये झालेल्या परीक्षेत ४२ गुण मिळाले होते. त्या विद्यार्थ्यांस या परीक्षेत १४८ गुण मिळाले आहेत. तर काही विद्यार्थ्यांचे गुण मागील परीक्षेपेक्षाही मोठ्या संख्येने कमी झाले आहेत. परीक्षेत त्यामुळे घोळ असल्याचा आरोप भावी शिक्षकांतून होत आहे.

टेट परीक्षा घाईघाईत घेण्यात आली होती. मात्र, परीक्षा संपून अडीच महिने झाले तरीही निकाल लागला नव्हता. त्यामुळे परीक्षेचा निकाल तात्काळ लावावा, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून वारंवार होत होती, मात्र, परीक्षेचा निकाल लावण्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने तीन महिन्यांचा कालावधी लावला. त्यामुळे या काळात बराच घोळ झाल्याचा दावा भावी शिक्षकांतून होत आहे.

आता लवकर नियुक्ती आणि समुपदेशन एकाच दिवशी पार पाडली गेली पाहिजे. त्यामुळे भावी गुरुजींना रोजगार उपलब्ध होईल. शासनाने गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर गुणवत्ता यादी आणि निवड यादी जाहीर करावी. काही उमेदवारांना मार्क कमी जास्त झाली आहेत. अशी शंका आलेली आहे. याची सखोल चौकशी करूनचं अंतिम यादी जाहीर केली तर बरं होईल. प्रामाणिक उमेदवारांवर अन्याय होऊ नये, अशी अपेक्षा भावी शिक्षकांनी व्यक्त केली आहे.टेट परीक्षा पार पाडली यावेळी गेल्या दोन भरतीमध्ये ज्यांना मार्क कमी होते त्यांना मात्र या वेळेला दुप्पट तिप्पट पट्टीने मार्क वाढलेले दिसून येत आहेत पण ज्यांचे मार्क दोन वेळा जास्त होते त्यांना अपेक्षापेक्षा खूपच कमी मार्क मिळाल्यामुळे प्रामाणिक व अभ्यासू विद्यार्थ्यांच्या मनामध्ये प्रचंड असा असंतोष निर्माण झाला आहे. परीक्षा परिषदेच्या संदर्भात शंका उपस्थित होत आहेत

## भररस्त्यामध्ये आढळला मानवी सांगाडा; पुणेकर भयभीत तर पोलिसांची उडाली धांदल

पुणे । प्रतिनिधी

पुण्यामध्ये एक धक्कादायक प्रकार घडला. येरवडा भागामध्ये भररस्त्यामध्ये मानवी पुणे : अक्षय फाटक : शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये वर्दळीच्या ठिकाणी एक विचित्र प्रकार घडलेला दिसून आला आहे. लोकांची गर्दी असलेल्या नगर रस्त्यावर भरदुपारी एका ठिकाणी मानवी सांगाडा पडला असल्याचे दिसून आले. सांगाडा असल्याची माहिती वाऱ्यासारखी येरवडा परिसरात समजली अन् एकच खळबळ उडाली. नागरिकांनी घटनास्थळी धाव तर घेतली, पण यामुळे एक भीतीचं वातावरण पसरलं. गोंधळही उडाला.



पुणे तिथे काय उणे असे म्हणतात. पुण्यातील भररस्त्यामध्ये मानवी सांगाडा पडला असल्याचे आढळून आले. याचे फोटो आणि व्हिडिओ देखील सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले. यामुळे बघ्यांची देखील मोठी गर्दी वाढली. येरवडा परिसरामध्ये हा प्रकार घडला. वाऱ्यासारखी बातमी पसरल्यानंतर पोलिसांनी तातडीने येथे धाव घेत तपास सुरू केला. तेव्हा तो सांगाडा खरा नसून प्लास्टर ऑफ पॅरिसने तयार केलेला कृत्रिम सांगाडा असल्याचे उघड झालं. नंतर पोलिसांनी सुटकेचा श्वास सोडला आणि दुसरीकडे भीतीचे वातावरणही दूर झाले.

येरवड्यातील गोल्डन आर्क लॉज समोर ही घटना घडली. याप्रकरणात घटनेची नोंद करण्यात आली आहे. गुरुवारी दुपारी मानवी सांगाडा पडल्याची माहिती नागरिकांनी दिली. परिसर अत्यंत वर्दळीचा आणि व्यापारी हालचालींचा आहे. त्यामुळे ही माहिती समोर येताच काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. दुपारची वेळ असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक आणि वर्दळही होती. मानवी सांगडा दिसल्याच्या माहितीने एखाद्या चित्रपटात शोभावी तशी पोलिसांच्या गाड्या व कर्मचाऱ्यांची इन्ट्री झाली. आपसूकच त्यामुळे पादचारी व वाहनचालकांना नेमकं काय झालं हे पाहण्याची उत्सुकता निर्माण झाली आणि नागरिकांनी तोबा गर्दी केली. मग काही वेळातच माणसाचा सांगाडा सापडला असल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे येरवडा भागात एक भीतीचे वातावरण पसरले.पोलिसांनी घटनास्थळी पाहणी सुरू केली. त्यावेळी छाती व कमरेचा सांगाड्याचा भाग पडलेला आढळला. सुरुवातीला खरा सांगाडा असल्याचा समज झाला. मात्र बारकाईने तपास केल्यानंतर तो प्रयोगशाळेत वापरण्यासाठी बनवलेला आर्टिफिशियल सांगाडा असल्याचे स्पष्ट झाले. तो प्लास्टर ऑफ पॅरिसपासून तयार करून तारेने जोडलेला होता, असे समोर आले. नंतर पोलिसांनी सुटकेचा श्वास सोडला.

## पडवी येथे हायवाने दाम्पत्याला चिरडले; पतीचा जागीच मृत्यू तर पत्नी

वरवंड । प्रतिनिधी

दौंड तालुक्यातील शिरूर सुपा-अष्टविनायक महामार्गावर भीषण अपघात झाला. पडवी फाट्यावर खडी वाहतूक करणाऱ्या हायवाने दुचाकीवरून जाणाऱ्या पती-पत्नीला हायवाने मागील चाकाखाली चिरडले. यामध्ये पती कबाजी भीमाजी कोळपे (वय ५५) यांचा जागीच मृत्यू झाला. तर पत्नी अलका कबाजी कोळपे या खासगी रुग्णालयात उपचार घेत आहे.



कबाजी भीमाजी कोळपे (वय ५५) व त्यांची पत्नी अलका कबाजी हे हिरो कंपनीच्या (एमएच ११ सीटी ५७०९) या दुचाकीवरून सोमजाई वाईनगर (जि.सातारा) येथून अष्टविनायक महामार्गावरून प्रवास करत होते. दरम्यान, पडवी फाट्यावर दुचाकी आली असता, ओव्हरलोड खडीने भरलेला हायवा (एमएच ४२ टी ११२८) थेट दुचाकीवरून गेली.


अष्टविनायक मार्गाच्या डाव्या व उजव्या बाजूस डोंगर भाग आहे. या भागात दगडी खाणीचे प्रमाण मोठे आहे. या खाणीकडून हायवा भरून येत असतात. अष्टविनायक मार्गावर थेट चढत असल्याने वारंवार किरकोळ स्वरूपाचे अपघात होत असतात. या सर्व प्रकाराकडे गाव, वनविभाग आणि महसूल विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे स्थानिक नागरिकांकडून बोलले जात आहे

येथील खाणींतील खडी, डस्ट, वाहतूक करणारे हायवा चालक हे अवजड वाहने चालविण्यासाठी अनुभवी नाहीत. तर काही वेळा मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवित असल्याचे नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. या हायवा चालकांनी वाहतुकीचे सर्वच नियम धाब्यावर बसवून सर्वसामान्य नागरिकांचे जीव धोक्यात घालण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याकडे परिवहन विभागाचे अधिकारी का गप्प आहेत? हा प्रश्न वारंवार सतावत आहे.

## पुणे महापालिकेतील प्रभागरचनेवरून महायुतीत मिठाचा खडा; अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाहीर नाराजी

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून शुक्रवारी पुणे महापालिकेची प्रभागरचना जाहीर करण्यात आली. राज्यभरात अ,ब, क असे महापालिकेचे प्रभाग समोर आले आहे. पुण्याच्या प्रभागरचनेत यावेळी काही बदल करण्यात आले आहे. भाजप आणि शिवसेनेला याचा फायदा तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मात्र या प्रभागरचनेमुळे फटका बसणार असल्याचे दिसत आहे. ही प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीतून नाराजीचा सूर उमटू लागला आहे.




नव्या प्रभागरचनुसार पुण्यातील मध्यवर्ती प्रभागात कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. मात्र उपनगरात काही बदल करण्यात आले आहेत. उपनगरात करण्यात आलेल्या फेरबदलांवरून अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते सुभाष जगताप यांनी आपली जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. त्याबाबत आपण अजित पवार यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे अजित पवारांच्या राष्टरवादीत बिनसल्याची चर्चा सुरू आहे.

भाजपने त्यांना अनुकूल असलेले प्रभाग बनवले आहेत.त्याचा शिवसेनेला किती फायदा होईल हे माहित नाही. पण राष्ट्रवादीला मात्र त्याचा फटका बसणार आहे. यावर आम्ही हरकत घेणार आहोत. उपमुख्यख्यमंत्री अजित पवारांशी यावर चर्चा करणार आहोत. प्रभागरचनेत मध्यवर्ती भागातील प्रभागरचनेत बदल झाले नाही. पण उपनगरात मात्र मोठे बदल करण्यात आल्याचे सुभाष जगताप यांनी म्हटले आहे.

पुणे शहरातील समस्या विकासासाठी सोडवायला हव्यात, सत्तेसाठी नव्हे. संपूर्ण प्रभागरचना ही भारतीय जनता पक्षाला (भाजप) फायदेशीर ठरणारी आहे. काही प्रमाणात शिवसेनेलाही त्याचा लाभ होणार आहे. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे प्रभाग वेडयावाकडया पद्धतीने विभागले गेले असल्याने, त्यांच्यात नाराजी पसरली आहे.

राज्य सरकारने महापालिका निवडणुकीसाठी चार सदस्यांचा एक प्रभाग असावा, असा निर्णय घेतला. राज्यात महायुतीची सत्ता असल्याने, प्रभागरचनेत तिन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या सोयीचे प्रभाग असतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र आज जाहीर झालेल्या प्रारूप प्रभागरचनेवरून केवळ भाजपचेच वर्चस्व दिसून येते.प्रभागरचना करताना पर्वती, कसबा, कॅन्टोन्मेंट, शिवाजीनगर या मध्यवर्ती भागातील विधानसभा मतदारसंघांतील प्रभागांची संख्या कमी होणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात आली आहे. मात्र उपनगरांतील प्रभाग मोठे केल्यामुळे, तेथील नगरसेवकांची संख्या वाढण्यावर मर्यादा आली आहे. याचा थेट फटका राष्ट्रवादी काँग्रेसला बसणार आहे.